
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : पहिले । अंक : दुसरा । सप्टेंबर २०१६ (मासिक) । मूल्य : ₹ 100 । AED 10 । US$ 2 www.panthastha.com




विश्व पांथस्थ

"

हे विश्वचि माझे घर ।
ऐसी मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर ।
आपण जाहला ।।

"


**संत ज्ञानेश्वर**



# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

संपादक : डॉ. संदीप कडवे




# विश्व पांथस्थ

**विश्व पांथस्थ**
वर्ष पहिले, अंक दुसरा
सप्टेंबर २०१६

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

व्यवस्थापकीय संपादक
**डॉ. संदीप कडवे**, दुबई

संपादकीय साहाय्य
**श्री. सचिन परब**, पणजी
**श्री. नितीन गायकवाड**, औरंगाबाद
**सौ. चैत्राली जानेफाळकर**, शारजा
**श्री. राजन तावडे**, अबू धाबी
**श्री. गजानन खोलगाडे**, बहरीन

जाहिरात समन्वय
**श्री. समीर खळदकर**, पुणे (+९१ ९८९०२ ३३३१४)

मांडणी, संपादन, मुद्रितशोधन
**मीडियानेक्स्ट इन्फोप्रोसेसर्स प्रा. लि.**, पुणे
**श्री. पुष्पराज पोपकर**, गोवा

निर्मिती साहाय्य
**श्री. ललित दुसाने**, नासिक
**श्री. राजेश अवस्थी**, नासिक

मूल्य : ₹ **100 I AED 10 I US$ 2**

**Vishwa Panthastha**
Volume 1, Issue 2
September, 2016

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Managing Editor
**Dr. Sandeep Kadwe**, Dubai

Editorial Support
**Sachin Parab**, Panjim
**Nitten Gaikwad**, Aurangabad
**Chaitrali Janefalkar**, Sharjah
**Rajan Tawade**, Abu Dhabi
**Gajanan Kholgade,** Bahrain

Advertisement Co-ordination
**Sameer Khaladkar**, Pune (+91 98902 33314)

Design, Editing, Proofreading
**MediaNext Infoprocessors Pvt. Ltd.**, Pune
**Pushpraj Popkar**, Panjim


Production Support
**Lalit Dusane**, Nasik
**Rajesh Avasthi**, Nasik

Price: ₹ **100 I AED 10 I US$ 2**

'विश्व पांथस्थ' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि., ३१ व ३४, पर्वती इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११०३७ येथे छापून ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे- ४११०५७ येथून प्रसिद्ध केले.
संपादक* - संदीप कडवे.
(*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)


'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, printed at Vikram Printers Pvt. Ltd., 31 & 34, Parvati Industrial Estate, Pune-Satara Road, Pune - 411037 and published at A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411057.
Editor* - Sandeep Kadwe.
(*Responsible for selection of news and articles under the PRB Act.)

All Rights Reserved, 2016 www.panthastha.com / www.kpart.me



# अनुक्रमणिका


- 'विश्व पांथस्थ' का? (संपादकीय) .................................. ४
- मरहबा मोदी (कव्हर स्टोरी) ........................................... ६
- 'अनिवासी मराठी करतील संस्कृती समृद्ध' ......................... १३
- अनिवासी भारतीय .................................................... २०
- योग व उपासक ........................................................ २२
- विश्व पांथस्थ (कविता) ............................................... २५
- खेड ते दुबई व्हाया मुंबई .............................................. २६
- या... सहभागी व्हा! 'विश्व पांथस्थ' तुमचेच आहे! ................ ३०
- प्रिय साकेत ............................................................. ३१
- जीवन में एक बार रहना सिंगापूर .................................... ३२
- मान्यवरांच्या शुभेच्छा .................................................. ३७
- दुबईमधील खाद्यभ्रमंती ................................................ ३८
- युरोप ट्रिप करताय? मग हे वाचाच! (पर्यटन विशेष) ............. ४०
- वाचनानंदासाठी 'ग्रंथ तुमच्या दारी' .................................. ४४
- पांथस्थ : एका वेगळ्या दृष्टिकोनातून ................................. ४६
- सभासद फॉर्म .......................................................... ४८



# 'विश्व पांथस्थ' का?

## संपादकीय

आपल्या मूळ गावापासून कर्मासाठी, पोटापाण्यासाठी ज्यांना स्थलांतर करावे लागते ते सर्व 'विश्व पांथस्थ', अशी ही छोटी व सुटसुटीत व्याख्या मला करावीशी वाटली. म्हणजे राजापूरमधून मुंबईत आलेला चाकरमानी पांथस्थ. महाराष्ट्रातून बिहार, उत्तरप्रदेश, बंगाल, केरळ, तमिळनाडूमध्ये गेलेलादेखील पांथस्थ किंवा अकोले, चिपळूण, औरंगाबाद, नासिक, पुणे, मुंबई, नागपूर, बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर येथून दुबई, लंडन, सॅनहोजे, टोकियो, सिडनी, आदिसअबाबा, नाताळ इथे स्थलांतरित झालेला भारतीयदेखील 'पांथस्थ'च. यातील काहींनी त्या त्या देशाचे नागरिकत्व स्वीकारले व ते कायमचे स्थलांतरित झाले, तर काहींनी असे नागरिकत्व स्वीकारले नाही किंवा त्यांना ते मिळाले नाही, म्हणून कायदेशीररीत्या ते भारतीयच (म्हणजे भारतीय पारपत्रधारक– पासपोर्ट होल्डर) राहिले. तरी आपल्यासाठी सर्वच 'पांथस्थ'.

अध्यात्माच्या भाषेत सांगायचे झाले, तर परमात्म्यापासून अलग झालेला आत्मा, ज्याने तात्पुरते मनुष्यशरीर धारण केले आहे असा जीव म्हणजेदेखील 'पांथस्थ'च. आपल्या सर्वांची अपरिहार्य गरज किंवा पंथ एकच, ती म्हणजे कर्म करीत राहणे व मरेपर्यंत जगण्याचा प्रयत्न करणे. हे फार अवघड वाटत असेल, तर येथेच सोडून देऊ व मूळ विषयाकडे वळू.

भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांची संख्या दोन कोटींपेक्षा जास्त आहे. या भारतीयांचे भारताच्या आर्थिक विकासात खूप मोठे योगदान आहे. मोठे म्हणजे किती? तर २०१४ साली अनिवासी भारतीयांनी, म्हणजे जे भारताबाहेर राहतात त्यांनी, भारतात ७०.३८ बिलियन अमेरिकन डॉलर्स (म्हणजे तब्बल ४,३६,३५६ कोटी रुपये) भारतात पाठविले, याला रेमिटन्स असे म्हणतात. यातील २२ बिलियन डॉलर (१,३६,४०० कोटी रुपये) पेक्षा जास्त केवळ आखातातून भारतात पाठविले गेले असावेत, असा अंदाज आहे. हा रेमिटन्सचा ओघ गेली कित्येक दशके सुरू आहे व वर्षानुवर्षे वाढतच आहे. आखातात केवळ ६० लाख अनिवासी भारतीय राहतात असे मानले, तर प्रत्येक अनिवासी भारतीयाने सरासरी २,२७,३३३ रुपये भारतात पाठविले, असा त्याचा अर्थ होतो. म्हणजे महिन्याला १८,९४४ रुपये. शक्यतो या अनिवासी भारतीयांची कुटुंबे गावाकडे राहतात, म्हणजे साधारण महिन्याला १९,००० रुपयांमध्ये पाच माणसांचे एक कुटुंब सुखाने राहू शकेल, असे समजायला हरकत नाही. या रकमेपैकी किती रक्कम कशावर खर्च होते याचा हिशेब मांडला, तर अर्थव्यवस्थेवर याचा काय परिणाम होतो, ते लक्षात येईल. यापैकी सर्वात जास्त रक्कम, किमान सुरुवातीला तरी, घर घेण्यात किंवा बांधण्यात खर्च होते. पाच–सहा वर्षांत घर बांधून किंवा घेऊन झाले, की ती रक्कम दुसऱ्या कारणाकरिता वापरण्यात येते. अर्थशास्त्राच्या भाषेत सांगायचे झाले, तर बहुतांश रक्कम ही खर्च केली जाते, त्याची गुंतवणूक केली जात नाही. एका अर्थाने खर्च झालेली रक्कम स्थानिक बाजारात खर्च केली जात असल्याने स्थानिक बाजाराला याचा खूप हातभार लागतो, परंतु त्याने स्थानिक भाववाढ मात्र

होते. मग स्थानिक लोक, ज्यांचे उत्पन्न एवढे नसते, त्यांना तेथे राहणे परवडत नाही, म्हणून त्यांनाही स्थलांतराचा विचार करावा लागतो. एका अर्थाने मग ते स्थलांतरितांचे गाव बनते. स्थलांतर हा गावाचा व त्या राज्याचा स्थायीभाव बनून जातो. केरळ राज्याचे उदाहरण या बाबतीत प्रकर्षाने द्यावेसे वाटते. महाराष्ट्र या बाबतीत खूपच मागे आहे. (काही टीकाकारांच्या मते महाराष्ट्रातून माणसांचे स्थलांतर कमी, लक्ष्मीचे म्हणजेच सुबत्तेचे स्थलांतरच जास्त होत आहे किंवा झाले आहे. परंतु आम्हाला त्या वादात पडायचे नाही.)

महाराष्ट्रातून परदेशांत स्थलांतर केलेल्या अनिवासी मराठी लोकांची संख्या सुमारे ११ लाख असावी, असा अंदाज आहे. त्यातील साधारण चार लाख अनिवासी मराठी आखातात राहत असावेत, असा अंदाज आहे. सरासरीनुसार अंदाजे १०,००० कोटी रुपये प्रतिवर्षी केवळ आखातातून महाराष्ट्रात रेमिटन्सच्या स्वरूपात येत असावेत आणि त्यातील साधारण ३,००० कोटी केवळ घर घेण्यात किंवा बांधण्यात खर्च होत असावेत, असा अंदाज आहे. बांधकाम व्यवसायासाठी ही फारच मोठी रक्कम आहे. भारतीय बँकेत यातील साधारण वार्षिक २,००० कोटी इतकेच ठेवींच्या स्वरूपात जमा होत असतील. तेही तात्पुरत्या स्वरूपात, जोपर्यंत त्या ठेवींना पाय फुटत नाही तोपर्यंतच. इतर देशांतून कदाचित अजून १०,००० कोटी महाराष्ट्रात येत असावेत, परंतु त्यांचा विनियोग कसा होतो त्याचा अंदाज करता येत नाही. मात्र ढोबळमानाने अजून ५,००० कोटी महाराष्ट्रात खर्च होतात असे गृहीत धरले, तर अर्थव्यवस्थेत वार्षिक निव्वळ भर १०,००० कोटी रुपयांची पडते, असे म्हणावयास हरकत नाही. केरळमध्ये हीच रक्कम साधारण वार्षिक ७०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

हा विषय इतक्या आकडेवारीनुसार सुरुवातीलाच मांडण्याचे कारण म्हणजे, अनिवासी मराठी (किंवा नॉन रेसिडेंट महाराष्ट्रीयन किंवा 'एनआरएम') लोकांचे महत्त्व अधोरेखित करणे. मोठे आकडे सांगितले, की काहीजणांना महत्त्व लागलीच पटते. परंतु या आकड्यांपलीकडे अनिवासी मराठी लोकांचे काही अस्तित्व आहे का? त्यांची काही ओळख महाराष्ट्रात आहे का? चार-पाच मोठी नावे सोडली, तर असे किती अनिवासी मराठी प्रसिद्ध झाले आहेत? लोकप्रिय असे मी म्हणणार नाही, कारण लोकप्रिय होणे ही 'एनआरएम'ची फारशी गरज नाही. त्यांना कुठे कोणत्या निवडणुकीला उभे राहायचे आहे? मुळातच त्यांना मतदानाचा अधिकारच सध्या नाही, किंवा सरकारी नियमाप्रमाणे तो असला, तरी प्रत्यक्षात अनेक नैसर्गिक वा व्यवस्थेच्या अडचणीमुळे बहुतांश 'एनआरएम'ना असा अधिकार बजावताच येत नाही. मग ज्यांना मतदानच करता येत नाही अशी 'एनआरएम' मंडळी राजकारणात निरुपयोगी व बिनमहत्त्वाची वाटतात, यात नवल ते काय! नाही म्हणायला काही बेरकी राजकारणी काही गरजवंत 'एनआरएम'चा अर्थपूर्ण वापर करून घेतात. परंतु 'एनआरएम'च्या घरचीच माणसे जेव्हा त्यांचा सोयीनुसार 'वापर' करून घेतात आणि जेव्हा अशी संख्या खूप वाढते, तेव्हा तो वैयक्तिक प्रश्न न राहता ती सार्वजनिक समस्या बनते.

आजपर्यंत 'एनआरएम'च्या वैयक्तिक किंवा सामाजिक प्रश्नांचा ऊहापोहच झाला नाही, कारण त्यातील बहुतांश समस्या समोरच आल्या नाहीत. मग त्यावर उपाय शोधणे दूरच. 'एनआरएम'ची एक समूह म्हणूनदेखील फारशी ओळख निर्माण झाली नाही, कारण त्यांना एकत्र आणण्याचा फारसा प्रयत्न झाला नाही. काही ठिकाणी 'महाराष्ट्र मंडळा'सारख्या संस्था निर्माण झाल्या, पण त्यांचे उद्दिष्ट व पोहोच मर्यादित राहिली. मंडळात येणारी 'मंडळी' एकमेकांना खूपदा फक्त चेहऱ्याने ओळखतात, काहीजण नावाने ओळखतात. कालांतराने कौटुंबिक ओळख निर्माण होते, परंतु अधिक मंडळी आपल्या कोषातून बाहेर येऊन निर्मळ सामाजिक संवाद साधताना दिसत नाहीत. असा संवाद होणे ही आता काळाची गरज आहे. याच गरजेतून 'विश्व पांथस्थ' मासिकाची सुरुवात करीत आहोत. या माध्यमातून 'एनआरएम'संबंधात अनेक गोष्टींची चर्चा आपण करणार आहोत. एकमेकांची ओळख करून घेणार आहोत, विचारांची देवाणघेवाण करणार आहोत, जमेल तशी एकमेकांना मदतही करणार आहोत, म्हणजे असा उद्देश आहे. यात सर्व 'एनआरएम' अर्थात अनिवासी मराठी मंडळींचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. हा एक सामाजिक प्रयोग आहे असे समजण्यास हरकत नाही. किंबहुना तो तसाच असेल या दिशेनेच 'विश्व पांथस्थ'चा प्रवास सुरू राहील. अनिवासी भारतीयांनी अनिवासी भारतीयांकरिता सुरू केलेला एक अनिवासी प्रयोग म्हणजे 'विश्व पांथस्थ' असेही आपण म्हणू शकतो. यात सहभाग सर्वांचा असेल किंवा असावा, अशी अपेक्षा आहे. म्हणजे भारतातील व महाराष्ट्रातील सरकारातील धुरीण, चाणक्य, प्रगल्भ राजकारणी ते शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, पांढरपेशा, मध्यमवर्गीय समाज, भारताबाहेर नोकरी धंद्यानिमित्त जाऊ इच्छिणारे, परदेशातून भारतात काही गुंतवणूक करू पाहणारे, सर्वांचाच सहभाग अपेक्षित आहे. यातूनच काही नवीन विचार पुढे येतील, नवीन सामाजिक प्रकल्प पुढे येतील व त्याची अंमलबजावणीदेखील याच 'विश्व पांथस्थ'च्या वाचकवर्गातर्फे होईल, अशी अपेक्षा आहे. या प्रवासात जे सामील होतील ते सर्व पांथस्थच असतील, अशीच अपेक्षा आहे. अन्यथा वर्गीय, जातीय, राजकीय वगैरे अस्मिता बाळगून कळपात प्रवास करणारे, एकमेकांबद्दल साशंक म्हणूनच आक्रमक असणारे बरेच कंपू आपण आपल्या आसपास बघतो, त्यापलीकडे विचार करण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. आपणही याच विचारांशी सहमत असाल, तर आपले 'विश्व पांथस्थ' परिवारात मनापासून स्वागत आहे.

उघड्या डोळ्यांनी, कानांनी, मनाने एकमेकांच्या गरजा, विचार समजून घेऊन, जुने न लागणारे अतिरिक्त बोजे टाकून देऊन, एका आनंददायी सहप्रवासाची सुरुवात करूया.

आपला सहप्रवासी, म्हणूनच पांथस्थ...

**डॉ. संदीप कडवे**
दुबई, संयुक्त अरब अमिरात

कव्हर स्टोरी



# मरहबा मोदी



भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याबरोबर चर्चा करताना संयुक्त अरब अमिरातीचे (युएई) पंतप्रधान शेख मोहम्मद बिन रशीद अल् मखतुम

## भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच 'युएई'ला भेट दिली. या बहुचर्चित आणि दीर्घप्रतीक्षित भेटीचा आँखो देखा वृत्तांत...

डॉ. संदीप कडवे

विश्व पांथस्थ



**दुबई क्रिकेट स्टेडियमवर ऑगस्ट २०१५ मध्ये झालेल्या सभेत बोलताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी**

भारताच्या पंतप्रधानांची बहुचर्चित व दीर्घप्रतीक्षित 'युएई' भेट १६ व १७ ऑगस्ट २०१५ रोजी मोठ्या धुमधडाक्यात पार पडली. तशी या भेटीची शक्यता 'नमों'च्या विश्व अश्वमेध यज्ञाला सुरुवात झाली, तेव्हाच निर्माण झाली होती. फक्त भेटीची वेळ जाहीर होण्याची प्रतीक्षा होती. 'मल्याळी नववर्ष दिन' हा मुहूर्त खरेतर आधीच लक्षात यायला हवा होता. आवश्यक ती पूर्वतयारी करून भेटीच्या सात दिवस अगोदर 'नमों'ची अबू धाबी व दुबई वारी जाहीर करण्यात आली. १६ व १७ ऑगस्ट हा मुहूर्त मुक्रर करण्यात आला. सध्याच्या सर्वात मोठ्या लोकशाही देशातील विश्वख्याती पावलेले माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीकडे लाखो अनिवासी भारतीयांचे डोळे लागले. रीतसर पत्र घेऊन भारत सरकारकडून मंत्री अबू धाबीत आले व क्राऊन प्रिन्स हिज हायनेस शेख मोहम्मद बिन झायेद अल् नाहयन यांना भेटीचा खलिता देण्यात आला. शासकीय पातळीवर भेटीची सर्व तयारी करण्यात यंत्रणा गुंतली. भारतीय जनता पक्षाची प्रचारयंत्रणाही कामाला लागली.

अबू धाबी, दुबईमध्ये मुख्य भेटी ठरल्या. मनसुबा साध्य करण्यासाठी दोन्ही बाजूंनी बिनीचे शिलेदार कार्यरत झाले. भारताला गरज विदेशी गुंतवणूक आणण्याची व 'युएई'ला गरज भरवशाची गुंतवणूक बाजारपेठ शोधण्याची. मोठ्या आकड्यांची उजळणी झाली, कराराचा मसुदा तयार झाला, जनसामान्यांसाठी घोषणांची बांधणी झाली, कोठे व कशी घोषणा करायची याची गुप्त तयारी झाली.

स्थानिक धनवंतांना, प्रतिष्ठितांना, नामवंतांना सांगावा धाडला गेला. दुबईमध्ये क्रिकेट स्टेडियमवर सार्वजनिक सोहळ्याची जंगी तयारी करण्याचे ठरले. तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवेशपत्र देण्याचे

> “अब दुबई एक लघु विश्व बन गया है। ठंडे से ठंडे इलाकों के लोग भी यहाँ के ४० फीसदी तापमान में रहना पसंद करते हैं। आखिर क्या ताकत दिखाई होगी, इस देश ने कि पूरा विश्व यहाँ आकर्षित हो जाता है।”




**श्री. मोदी यांच्या सभेला उपस्थित असलेले सुमारे पन्नास हजार अनिवासी भारतीय. या वेळी अनिवासी महाराष्ट्रीयांची उपस्थिती लक्षणीय होती**

निश्चित झाले. एका दगडात अनेक पक्षी मारले जाणार होते. वातावरणनिर्मिती होणार होती. अनिवासी भारतीयांच्या एका मोठ्या डेटाबेसची आपोआप निर्मिती होणार होती. सर्व कसे व्यावसायिकरीत्या सुनियोजित होत होते. स्वयंसेवकांची मोठी पलटण कामाची धावपळ करण्यास सिद्ध झाली. शंख वाजला, वृत्तपत्रांत बातम्यांचा रतीब सुरू झाला. सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून जनसामान्यांशी संपर्क सुरू झाला.

जनताजनार्दनाला उत्सुकता लागली. 'नमो इन दुबई'वर नोंदणी करण्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. क्रिकेट स्टेडियमची आसनक्षमता केवळ २५ हजार ते ३० हजार. पण मैदानात आणखी १० हजार लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली. सुरक्षेची सिद्धता करण्यात आली आणि तो सुदिन उजाडला.

१६ ऑगस्टला, ३४ वर्षांनंतर भारतापासून केवळ तीन तासांच्या अंतरावर असलेल्या जगातील एका वेगाने विकसित होणाऱ्या देशाला– संयुक्त अरब अमिरातीला– जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील सर्वात लोकप्रिय, स्वयंप्रेरित, धोरणी व शक्तिशाली पंतप्रधानांचे– नरेंद्र मोदींचे– आगमन झाले. स्वतः क्राऊन प्रिन्स त्यांच्या सर्व भावंडांबरोबर विमानतळावर 'नमों'चे स्वागत करण्यास हजर होते, हेही अभूतपूर्व होते. अबू धाबीत 'नमों'च्या भेटीगाठींचा, खलबतांचा, करारांचा सिलसिला दिवसभर सुरू होता. मसदार सिटी व शेख झायेद मशीद या प्रमुख स्थळांना भेटी दिल्या. सायंकाळपर्यंत एक प्रमुख बातमी जाहीर झाली. अबू धाबीत अबू धाबी सरकारने मंदिरासाठी जमीन दिल्याची बातमी एक सकारात्मक वातावरण निर्माण करून गेली. आता उत्सुकता लागली ती 'नमों'च्या दुबई कार्यक्रमाविषयी.

एव्हाना सर्वसामान्य जनता भेटीसाठी सर्व सिद्धता करून सहकुटुंब सहपरिवार कित्येक तास अगोदरच कार्यक्रमस्थळी मिळेल त्या वाहनाने रवाना झाली

> भारत सरकार ने 'मदद' नाम का एक ऑनलाइन प्लैटफॉर्म बनाया है, जिसका इस्तेमाल करके दुनिया भर में फैले हुए भारतीय अपनी बात आगे पहुंचा सकते हैं।



**क्राऊन प्रिन्स ऑफ अबू धाबी मोहम्मद बिन झायेद अल् नहायन यांच्याशी हस्तांदोलन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी**

होती. बाहेरील तापमान ४५ डिग्री सेंटीग्रेडपेक्षा जास्त होते. तरी होणारी गर्दी लक्षात घेऊन लोक दुपारी दोनपासूनच स्टेडियमला पोहोचू लागले. गाड्यांचीही मोठी रांग लागली. दुपारी सव्वातीन वाजता पोहोचलेली माणसे जवळच्या पुलावरच अडकून पडली व बऱ्याचजणांनी तेथेच गाड्या पार्क करून पायीच प्रवेशद्वाराकडे जाण्यास सुरुवात केली. इतक्या रणरणत्या उन्हात वेगवेगळ्या वेशभूषेतील हजारो भारतीय स्त्री–पुरुष, मुले उत्साहाने एक–दीड किलोमीटर अंतरावरील क्रिकेट स्टेडियमकडे चालत जाताना दिसत होते. प्रवेशद्वाराकडे कसे जायचे ते केवळ अदमासे ठरवत होते, फलक कुठेच नव्हते. पण गर्दी नेहमीच आपला रस्ता शोधून काढते. प्रवेशद्वारापर्यंत पोहोचेपर्यंत सर्वजण प्रचंड घामाघूम झाले होते. कासवाच्या गतीने गाड्या पार्किंगकडे सरकत होत्या. दुपारी चार वाजताच सर्व प्रवेशद्वारांवर प्रचंड झुंबड उडाली. एक–एक दिव्य पार करीत लोकांनी स्टेडियममध्ये प्रवेश मिळविला. वाटेवर पाच

> क्राऊन प्रिन्स ने हिंदुस्थान में साढ़े चार लाख करोड़ रुपये निवेश करने का वादा किया है और अबू धाबी मे मंदिर बनाने के लिए दी जमीन।

> अटल बिहारी वाजपेयी जब प्रधानमंत्री थे और उन्होंने न्यूक्लियर टेस्ट किए थे, तो भारत पर तमाम बैन लगा दिए गए थे। तब वाजपेयीजी ने दुनिया भर में फैले भारतीयों से देश की मदद के लिए आवाहन किया था। आज मैं गर्व से कह सकता हूँ कि वाजपेयीजी के कहने पर भारत की तिजोरी भरने में खाड़ी देशों में मजदूरी करने वालों ने अहम भूमिका अदा की।

दिरहामला एक छोटी पाण्याची बाटली विकणारे काही सामाजिक कार्यकर्ते दिसत होते, तहानलेले गरजवंत तीही विकत घेत होते.

मैदानात प्रवेश मिळाला, येणाऱ्या भक्तांची फत्ते झाली. भराभर आपापल्या रांगेनुसार रंक आणि राव स्थानापन्न झाले. स्टेडियमच्या आतमध्ये मोठे स्टेज, मोठे स्क्रीन्स व मैदानात खाण्याची व्यवस्था जय्यत होती. पाणी मात्र येथे मोफत वाटले जात होते.

थोड्याच वेळात एका शोभायात्रेला सुरुवात झाली. भारतातील विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन यातून घडत होते. यात भाग घेणारे कलाकार अगदी मनापासून कलाप्रदर्शन करीत होते. काही वेळानंतर रंगमंचावर सांस्कृतिक कार्यक्रम, नाच व गाणी सुरू झाली. त्यात अनेक कलाकारांनी अप्रतिम कला सादर केली. देशभक्तिपर गीतांनी वातावरण भारले गेले. लोकांच्या घोषणांनी स्टेडियम दणाणून गेले.

लोकांना उत्सुकता होती ती 'नमों'च्या आगमनाची. वर हेलिकॉप्टर भिरभिरले व रंगमंचावरून 'नमों'च्या आगमनाची वर्दी देण्यात आली. आठ वाजण्याच्या सुमारास 'नमों'चे रंगमंचावर लोकांच्या टाळ्यांच्या गजरात स्वागत झाले. दोन्ही देशांचे राष्ट्रगीत मोठ्या अभिमानाने पार पडले. ५० हजार लोक दुबईत एकसाथ राष्ट्रगीत म्हणण्याचा हा दुर्मीळ अनुभव अंगावर रोमांच उभे करणारा होता, यात शंका नाही. गर्दीला राष्ट्रगीतानंतर 'भारत माता की जय' असे म्हणण्याचा अनुभव नव्हता. पण महामहिम 'नमो' कसे काय विसरणार? तीन वेळा भारतमातेचा प्रचंड जयजयकार करून मगच 'नमों'च्या भाषणाला सुरुवात झाली.

नंतरचा एक तास 'नमों'चा आवेश, भाषणातील नेमक्या ठिकाणी लोकांकडून दाद मिळविण्याची हातोटी, पॉज घेऊन



**अबू धाबीपासून जवळच असलेल्या मसदार या 'झीरो कार्बन स्मार्ट सिटी'ला मोदी यांनी भेट दिली**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अबू धाबीतील शेख जायेद ग्रँड मॉस्कला भेट दिली

खूप काही सांगून टाकण्याची पद्धत 'याचि देही याचि डोळा' ५० हजार भारतीयांनी अनुभवली. त्यात मल्याळी लोकांना नवीन वर्षाच्या मल्याळी भाषेत दिलेल्या शुभेच्छा होत्या, मंदिराला जमीन देण्याच्या निर्णयाबद्दल अबू धाबी सरकारचे उपस्थितांकडून करवून घेतलेले अभिनंदन होते, समझने वालोंको इशारा होता, उच्चारताना जीभ चाचरेल अशा साडेचार लाख कोटी रुपयांच्या थेट परकीय गुंतवणुकीबद्दल घोषणा होती, शेजारी देशांना भारताने गेल्या एका वर्षात स्वतःहून काय मदत पुरविली याची यादी होती, अनिवासी भारतीयांनी पूर्वी केलेल्या आर्थिक मदतीची जाणीव होती. जाता जाता उगीच कॉन्सुलर व वकिलातीतील कर्मचाऱ्यांना दिलेल्या सूचनांचा उल्लेखदेखील होता. आवेश खूप होता, उत्साह खूप होता. बरोबर एक तासाने 'नमों'नी आपले भाषण संपविले. जमावाने उभे राहून या परफॉरमन्सला मनापासून दाद दिली. प्रोटोकॉलप्रमाणे पाहुणे प्रथम गेले. मोदी येताना थेट रंगमंचावर आले, जाताना रंगमंचावरून थेट विमानतळाकडे रवाना झाले. पाठीमागे राहिले ते सर्वसामान्य आखाती भारतीय आणि सात दिवसांच्या धावपळीमुळे थोडेसे विसावलेले स्वयंसेवक. दुबईत आल्यामुळे शिस्तीत, आपापल्या मर्यादेत राहणारे, वास्तवाची सदैव जाणीव ठेवणारे. पुन्हा एकदा आपापल्या आसपासच्या लोकांकडे त्यांचे लक्ष गेले. हेच आपल्याबरोबर आहेत आणि वेळप्रसंगी हेच आपल्याबरोबर राहणार आहेत, या वास्तवाची त्यांना जाणीव झाली. कार्यक्रमाला येताना काहीच घेऊन येऊ नका, अशी सक्त ताकीद दिल्यामुळे सर्वच रिकाम्या हाताने आले होते. ते सर्व, आम्ही मोदींच्या ऐतिहासिक भेटीचे, कार्यक्रमाचे साक्षीदार होतो या आनंदात, जमेल तशा आठवणी व फोटो बरोबर घेऊन, या कार्यक्रमातून, मोदींच्या भेटीतून आपल्याला काय मिळाले याचा विचार करीत, पुन्हा एका मृगजळाच्या शोधात, रिकाम्या हातानेच परत निघालो. ■



**मोदींना भेटण्याची, जवळून पाहण्याची, हात मिळविण्याची, जमले तर त्यांच्याबरोबर फोटो काढण्याची इच्छा होती. हे निवडणुकीचे भाषण होते का? एन.आर.आय.च्या प्रश्नावर ते काहीच बोलले नाहीत, अशा प्रतिक्रिया बहुसंख्य लोकांनी व्यक्त केली. त्यापैकी काही प्रातिनिधिक प्रतिक्रिया...**

मोदी भेटीमुळे एका रात्रीत फरक पडणार नाही, परंतु भारतीयांचे मनोबल उंचावण्यासाठी या भेटीचा नक्कीच उपयोग होईल.

**– प्रचीती तलाठी**

मोदींची भेट अभूतपूर्व आहे. मानले बुवा मोदींना. बंदे मे दम है। इतक्या लोकांना एकत्र आणण्याची धमक फक्त मोदींमध्ये आहे.

**– नितीन पवार**

मोदी पक्के हुशार आहेत, भाषण चांगले करतात. पुढे काय बदल होतो ते कळेलच.

**– अपर्णा पैठणकर**

मुलाखत

# अनिवासी मराठी करतील संस्कृती समृद्ध

## 'ज्ञानपीठ' विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांना विश्वास



'ज्ञानपीठ पुरस्कारा'ने सन्मानित ज्येष्ठ मराठी साहित्यिक 'कोसला'कार डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी 'विश्व पांथस्थ'च्या पहिल्यावहिल्या अंकासाठी दिलेली खास मुलाखत.


मुलाखतकार :
**डॉ. संदीप कडवे**

शब्दांकन व संपादन :
**नितीन गायकवाड, औरंगाबाद**

डॉ. भालचंद्र नेमाडे यांची थोडक्यात ओळख करून देणे अवघड आहे. साहित्यातही खूपजणांना 'नेमाडे' कळायला खूप वेळ लागतो. त्यांचे चाहते पण खूप आहेत व टीकाकारही खूप आहेत. पण त्यांच्या अभ्यासूपणाला व लिखाणाला सामाजिक, साहित्यिक व शासकीय मान्यता खूप मिळाली. २०१४ चा देशातील सर्वोच्च साहित्य सन्मान सुवर्ण जयंती 'ज्ञानपीठ पुरस्कार' डॉ. भालचंद्र नेमाडे यांना मिळाला व 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळविणारे ते ५५ वे साहित्यकार ठरले. मराठीत यापूर्वी 'ज्ञानपीठ पुरस्कार' वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) आणि विंदा करंदीकर यांना मिळाला आहे. डॉ. नेमाडेंच्या साहित्याने तीन पिढ्यांना प्रभावित केले आहे.

२०१४ चे 'ज्ञानपीठ पुरस्कार' विजेते डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे यांचा जन्म १९३८ साली खानदेशातील सांगवी गावी झाला. १९६३ मध्ये 'कोसला' या त्यांच्या कादंबरीने मराठी साहित्यात मोलाची भर घातली व एक नवी दिशा दिली. १९९० मध्ये 'टीका-स्वयंवर'साठी त्यांना 'साहित्य अकादमी पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. 'कोसला'चा अनुवाद इंग्रजी, हिंदी, गुजराथी, कन्नड, आसामी, पंजाबी, बंगाली, उर्दू, उडिया व इतर भाषांमध्ये झाला आहे. 'कोसला'नंतर 'बिढार', 'हूल', 'जरीला' व 'झूल' या वेगळ्या कादंबऱ्या डॉ. नेमाडे यांनी लिहिल्या. २०१० साली 'हिंदू - जगण्याची समृद्ध अडगळ' ही त्यांची बहुप्रतीक्षित कादंबरी प्रकाशित झाली. 'मेलडी' व 'देखणी' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले. 'टीका स्वयंवर', 'साहित्याची भाषा', 'तुकाराम', '**Nativism**', '**The influence of English on Marathi**', '**Indo - Anglian Writings**' हे समीक्षात्मक साहित्य प्रकाशित झाले. २०११ मध्ये डॉ. नेमाडे यांना 'पद्मश्री' सन्मान मिळाला.

'विश्व पांथस्थ'च्या पहिल्या अंकासाठी डॉ. नेमाडे यांची मुलाखत घेण्याचे खूप आधीपासून मनात होते. मागील वर्षी 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'च्या 'ग्रंथ तुमच्या दारी' या योजनेचा परदेशातील शुभारंभ दुबईत झाला. त्याचवेळी विनायक रानडे यांच्याकडून आग्रहाने 'कोसला' व 'हिंदू - जगण्याची समृद्ध अडगळ' या दोन कादंबऱ्या मागवून घेतल्या होत्या. हर्षल नेमाडे म्हणजे डॉ. नेमाडेंचा मोठा मुलगा, मी व नितीन गायकवाड, आम्ही औरंगाबादमध्ये एकत्र शिकलो. त्यामुळे डॉ. नेमाडेंशी मुलाखतीसाठी संपर्क करणे व तयार करण्याची जबाबदारी साहजिकच नितीन गायकवाड यांच्यावर आली व त्यांनी ती आनंदाने स्वीकारली. डॉ. नेमाडे गोव्यात आहेत, असे कळले म्हणून तातडीने गोव्यात दाखल झालो. डॉ. नेमाडे यांनीही अतिशय आनंदाने मनमोकळी मुलाखत दिली. आमचे मित्र सचिन परब हेदेखील बरोबर होते. या मुलाखतीच्या निमित्ताने डॉ. नेमाडे यांचा प्रचंड व्यासंग, अभ्यास यांची जवळून ओळख झाली. 'विश्व पांथस्थ'च्या वाचकांचे हे सुदैव की 'अनिवासी भारतीय' या विषयावर डॉ. नेमाडे यांची बहुमोल मते आपल्याला वाचायला मिळत आहेत. सुरुवातीला 'विश्व पांथस्थ' का? याविषयी त्यांना माहिती दिली. त्यांना 'विश्व पांथस्थ'ची कल्पना खूप आवडली. नंतर मुलाखतीला सुरुवात केली.

विश्व पांथस्थ : भाषेच्या बाबतीत, मराठी भाषेचा आपला आग्रह आम्हाला पूर्णपणे माहीत आहे आणि मान्य आहे. आम्ही परदेशात राहतो, त्यामुळे मराठीचा आमचा दैनंदिन व्यवहारात संबंध तसा कमी येतो. परंतु आमचा प्रयत्न असतो, की हा वापर असावा, वाढावा व मराठी टिकावी. तेव्हा अनिवासी भारतीयांकरता मराठी भाषेचं महत्त्व




*'ज्ञानपीठ पुरस्कार' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून स्वीकारताना डॉ. भालचंद्र नेमाडे*

**आणि ती कशी टिकावी, याकरता आपण काय सुचवाल?**

**डॉ. नेमाडे :** मला तर पहिल्यांदा, अनिवासी मराठी भारतीयच मोठ्या प्रमाणात मराठी भाषेबद्दल जास्त काम करू शकतील असं वाटतं. याचं कारण म्हणजे तुम्हालाच जास्त गरज भाषेची असते. एकतर तिथे भाषेवर इतकं Invasion (आक्रमण, अतिक्रमण) असतं आणि भाषा ही अशी गोष्ट असते, की ती तुमच्या कोअरपर्यंत असते आणि Invasion ज्या वेळी होतं, त्या वेळी त्या कोअरला जास्तीत जास्त Active व्हावं लागतं. त्यामुळे कदाचित मुंबईतल्या माणसाला मराठीबाबत एवढं प्रेम नसेल (ते दाखवतात)... पण तिथे परदेशात मात्र मराठीचं स्पिरिट जास्त असावं, असं मला वाटतं. याचा अनुभव मी इंग्लंडमध्ये वर्षभर असताना मला आला होता. तिथे महाराष्ट्र मंडळ वगैरे एकत्र पोवाडे म्हणण्याचे वगैरे कार्यक्रम करत असत. तेवढ्याशा त्या एक-दोन दिवसांत त्यांना आतून किती प्रेम आहे, किती त्यांना टिकवावं वाटतं, हे जाणवलं. मग एखादं आवडलेलं पुस्तक ते सगळीकडे सर्क्युलेट करणार, मग अमुक एका दिवशी चर्चा करून म्हणणार, Views शेअर करणार, असं जे आपल्या इथे एवढ्या Active प्रमाणात दिसत नाही, तिथे ते मला दिसलं.

**विश्व पांथस्थ : मराठीच्या पलीकडे, तुम्ही स्थलांतराचा विषय वेगवेगळ्या कादंबऱ्यांतून व लिखाणातून फार पूर्वीपासून हाताळला आहे. आम्ही (मुख्यत: आखातातले) अनिवासी भारतीय तात्पुरते स्थलांतरित आहोत. अशा स्थलांतरितांच्या प्रश्नांबद्दल काय सांगता येईल?**

**डॉ. नेमाडे :** आता तुमचे प्रश्न... आज आपण स्थलांतरितांचे जर प्रकार केले तर, एकतर self exiled (सेल्फ एक्झाईल्ड) असे असतात, त्यांना आपल्या देशातून आपणहूनच बाहेर जावंसं वाटतं. मुद्दाम कुणी त्यांना हाकलत नाही, 'जा' म्हणत नाही. जसं आपण ऑस्ट्रेलियातले लोक exiled म्हणतो, म्हणजे त्यांना काढूनच दिलं आणि नंतर त्यांना परत यायची शक्यताच नाही. तसे काही तुम्ही लोक नाहीत. हे जे self exiled आहेत, they can choose when to be where, when to be not there, अशी ती category आहे. अशावेळी तुमचा antenna जास्त active झालेला असतो. तुमच्यावर तुमचाही व तिकडचाही एक impact येतो, तो महत्त्वाचा असतो. तो इथल्या माणसात येणं शक्य नाही. मग दुसऱ्या ज्या categories आहेत, म्हणजे expatriates, political immigrants (बाहेरच्या देशाची माणसं व राजकीय स्थलांतरित), त्यापेक्षा ही category जास्त active आणि bilingual झाल्यामुळे आपोआपच त्यांना, they work in two systems, permanently अशी ती category असते. त्यामुळे हे सर्व गल्फमधले लोक आहेत- म्हणजे मराठीच आहे असं नाही, तर सर्व म्हणजे तुम्ही मुस्लिम असा की शीख असा, मेनन, गुजराथी, मराठी, कानडी, मल्याळी, तेलुगु वगैरे सगळे मिळून एक multicultural category तयार होते. हा जो ethos तयार होतो, that is very important. तो हिंदुस्थानातल्या लोकांना feel करता येत नाही किंवा ते या लेव्हलपर्यंत जातही नाहीत. आपसांत उगीच काही गुजराथी-मराठी किंवा ब्राह्मण-मराठा वाद यातच त्यांची शक्ती खर्च पडते. पण हा एक मोठा ethos (एखाद्या संस्कृतीचं, जमातीचं गुणविशेष किंवा वैशिष्ट्य) तुम्हाला मिळतो. त्यामुळे एखादं मोठं सांस्कृतिक काम होण्याची शक्यता कदाचित तिकडून आहे आणि हे आपल्याला दिसतंही. म्हणजे इंग्रजी literature चं म्हणा किंवा एकूण world literature मध्ये हे जे exiles असतात, त्यांनी खूप काम केलं आहे. Original काम केलं आहे. दोस्तोयव्हस्की, तो नेहमी रशियाच्या बाहेरच होता, म्हणजे जर्मनी, फ्रान्स वगैरेमध्ये तिथल्या लोकांवर टीका करून तो रशियावरच लिहायचा, म्हणजे ज्याला frontier म्हणतात ना, ती क्रॉस केल्यावरच खरी कळते. म्हणजे unless you transgress, you can not expect your best असं मला इंग्लंडमध्ये अपील झालेलं तत्त्व आहे, पण परदेशांत वाटायला लागतं, की आपण केवढ्या मोठ्या गोष्टीला मुकतो, एवढी हिंदुस्थानी variety,



विश्व पांथस्थ

variations आणि multilingualism, multiculturalism तिकडे ते काहीच नाही, history नाही, geography नाही. इतक्या गोष्टी सोडून आपण जातो whether it is worth अशी जी feeling येते ती literature ला अतिशय महत्त्वाची आहे.

**विश्व पांथस्थ : In fact हा तुम्ही फार महत्त्वाचा मुद्दा मांडला. कारण आम्हाला– NRI ना ते feeling येतं आणि एका मर्यादेनंतर काहींना ते feeling manage करता येतं, काहींना नाही करता येत. मग त्यात ज्यांना manage नाही करता येत ते depress होतात किंवा परत येतात, जे manage न करता depress होऊन तिथे राहतात, त्यांच्यावर, त्यांच्या कुटुंबावर याचा खूप परिणाम होतो. आमच्याकडे असे problems आहेत. NRI च्या आत्महत्यादेखील खूप प्रमाणात होतात. हा एक गंभीर विषय आहे. पण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची जेवढ्या प्रकर्षानं आपण चर्चा करतो, तेवढ्या प्रकर्षानं NRI च्या प्रश्नांची चर्चा कुणी करतच नाही. याबद्दल आपण काय म्हणाल?**

**डॉ. नेमाडे :** याबद्दल आपली संकुचित विचारपद्धती (narrow vision) कारणीभूत आहे. आपल्याकडे हा narrowness जास्त झाला आहे. जो तो आपापल्या circle पुरतं, आपापल्या गावापुरतं, आपापल्या community किंवा फारतर region, जास्तीत जास्त state पर्यंत पोचतो. म्हणजे महाराष्ट्र, केरळ हा अलीकडचा फार धोकादायक trend आहे. खरंतर हे सगळे मिळून आतून एकच आहोत. कुठल्याही आपल्या आधीच्या ज्या गोष्टी होत्या, म्हणजे तेव्हा आपण आपल्या जाणिवांच्या frontiers cross करत होतो, म्हणजे महाराष्ट्रीयनीझम किंवा इस्लाम किंवा हिंदुइझम, म्हणजे त्या वेळी मराठा empire होतं. म्हणजे अगदी तमीळमधले पंजाबचे लोक आणि काबुलमधले महादजी शिंदेंचे लोक, स्वत: महादजी आणि इकडे बंगालमधले भोसले वगैरे हे सगळे मराठा empire चे कर्ते. ते लोकल भाषा शिकायचे, लोकल भाषेत बोलायचे, तिकडे महादजी शिंदे शेरोशायरी करायचे, ते तंजावरचे लोक तमीळमध्ये साहित्यनिर्मिती करायचे. तरीही त्यांनी मराठी आणि मराठीपण जपलं. हा जो एकमेकांत मिसळून जाण्याचा प्रकार होता, म्हणजे मुघल व दक्षिणेतल्या लोकांनी एक भाषाच नवीन सुरू केली– उर्दू– ती आता जगप्रसिद्ध भाषा झाली. त्यात गालिब वगैरे लोकांनी खूप काम केलं. त्यात कितीतरी मराठी शब्द असतात. हे नवीन creative जे काही घडलं, ते हे आपले मराठी लोक आता काही घडवू शकत नाहीत. आता तुम्ही हा 'विश्व पांथस्थ'चा उपक्रम सुरू केला, तर आता नवं काही घडायची शक्यता आहे. कारण त्याला platform मिळाला, की ते व्हायला सुरुवात होते, म्हणजे तुमच्यातून आता काही नवीन येईल, या consciousness नं ती शक्यता वाढते. आता म्हणजे ते तिकडे गेले म्हणजे संपलं. तिकडे पैशांसाठीच जातात, तिकडे गेले म्हणजे तुटले, असं general मत आहे, ते बदलायला यामुळे मदत होईल.

**विश्व पांथस्थ : आता आपल्या बोलण्यात एक महत्त्वाचा मुद्दा आला, तो असा की बाकीच्या भाषांचे मराठीवर संस्कार झाले आहेत. बाकीच्या भाषांतून खूप शब्द आले किंवा त्याची धाटणी घडत गेली. मग यात फक्त भाषेवर संस्कार झाले, की संस्कृतीवरही संस्कार झालेत?**

**डॉ. नेमाडे :** नुसता भाषेवर संस्कार होत नाही. परकी भाषा येते, तेव्हा त्याबरोबर तिचं culture येतं. आपण एखादा शब्द घेतला, म्हणजे, समजा पर्शिअनमधला एखादा शब्द म्हणजे 'अर्ज', म्हणजे 'अर्ज करतो' असं आपण म्हणतो. 'अर्ज' हा शब्द फक्त घेणं असा नसतो, तर अर्ज करण्यामागे जे culture असतं ते तुम्ही स्वत:ला low (कमी) समजायचं, कुठेतरी दाद मिळेल. (हा पुन्हा पर्शिअन शब्दच आहे 'दाद' देणं) तेव्हा दाद देण्याची शक्यता असणं, म्हणजे त्यावर आपण विश्वास ठेवणं, त्या माणसाचाही मग विश्वास बसतो, की हा आपल्याकडे इतका लीन होऊन येतोय, तर आपण याला न्याय दिला पाहिजे, मग justice (न्यायाची) एक कल्पना त्यामधून तयार होते. या एका शब्दामागचं जे काही semantic field आहे हे त्याच्याबरोबर मराठीत येतं. असे मग मराठीतले एकूण ५० टक्के पर्शिअन, अरबी शब्द, इंग्रजी शब्द आपण वापरतो. याबरोबर ते culture (संस्कृती) आपल्यात येतं आणि हा आपला मोठेपणा आहे, की ते आपण घेत राहतो. म्हणजे आपली intergrating power जास्त आहे.

**विश्व पांथस्थ : मराठी गझलमध्येदेखील ते शब्द खूप मोठ्या प्रमाणात वापरले जातात.**

**डॉ. नेमाडे :** कुठल्याही कविता, कादंबऱ्या घ्या, मोठ्या प्रमाणात उर्दू, पर्शिअन, अरबी, कानडी शब्द असतात. आपण मराठी असं म्हणतो ते सगळ्यांचं मिळून झालेलं असतं, हा मराठीचा मोठेपणा आहे. इतर भाषांत मला ते इतकं नाही सापडणार. इंग्रजीदेखील इतकी लिबरल (सुधारणावादी) नाही.

**विश्व पांथस्थ : म्हणजे फक्त अनिवासी भारतीयांनी मराठी टिकवून ठेवावी असं नाही, तर त्यात काही value add देखील करता येईल.**

डॉ. नेमाडे : करता येईल, तुम्ही तिकडे राहता, त्यांच्याबरोबर interact करता, त्याअर्थी तुमचं जुळतंय सगळ्यांशी. आमचा एक शेजारी तिकडे वीस वर्षं राहतो, त्याची मुलं अरबी शिकतात, म्हणजे मराठीपणा टिकवून ते अरबी absorb करतात, म्हणजे किती मोठ्या प्रमाणावर हे react होतात. म्हणजे हा फार encouraging trend आहे तो वाढवला पाहिजे.

**विश्व पांथस्थ : Financially किंवा economicaly NRI चं खूप मोठं योगदान त्या त्या देशांमध्ये आहे आणि भारतातही आहे. कारण तिथे ते खर्च करतात, पण save ही करतात आणि भारतातही remittance पाठवतात, जे भारतात consume होतात. म्हणजे जर हे remittance आले नसते, तर आपली consumer oriented economy जेवढी वाढली, तेवढी ती वाढली नसती. पण यापलीकडे जाऊन NRI ना राजकीय हक्क कुठे नाहीत. राजकीय दृष्ट्या त्यांना जवळपास वाळीत टाकलं आहे. त्यांचे प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता भासत नाही किंवा त्यांना एक राजकीय दृष्ट्या महत्त्व द्यावं असं वाटत नाही. त्यांच्याकडून पैसे उभारण्यासाठी, funds गोळा करण्यासाठी मोहिमा काढल्या जातात, खास त्यांच्याकरता बाँड्स काढले जातात, पण त्यांना राजकीय वा सामाजिक प्रवाहात गुंतवून घ्यावं, असे कुठले प्रयत्न होताना दिसत नाही. असे कुठले प्रयत्न करावे, असं तुम्हाला वाटतं?**

**डॉ. नेमाडे :** तुम्ही जिथे राहता, तिथल्या political situation वर ते अवलंबून आहे.

**विश्व पांथस्थ : तिकडच्या political situation मध्ये आम्हाला involve नाही होता येत. तिकडे Shaikhdom, Sultanate,**



**Kingdom आहेत, तर तिथे फार फार तर आम्ही advisor म्हणून काम करू शकतो. मी तिथे एका शिपिंग कंपनीच्या, जी दुबई स्टॉक एक्सचेंजवर लिस्टेड आहे, तिथे Independent Director म्हणून Board वर निवडून गेलो. नंतर कंपनीची स्थिती सुधारण्यासाठी Managing Director म्हणून दोन वर्षं जबाबदारी सांभाळली. आमचे १४,००० भागधारक होते आणि बहुतांश अरबी होते.**

**डॉ. नेमाडे :** हा जो **confidence** त्यांनी तुमच्यावर दाखवला त्याला तुम्ही **payback** म्हणून काही दिलं का?

**विश्व पांथस्थ : त्या विश्वासाला पात्र ठरत ती जबाबदारी समर्थपणे पेलत company turnaround करून दाखवली. त्या कंपनीला कठीण परिस्थितीतून बाहेर काढलं.**

**डॉ. नेमाडे :** असंच interact करणं, त्यांच्या culture चा आणि आपल्या culture चा असा संवाद शक्य आहे. कारण तुमच्यावर confidence जो आहे, त्याचा मराठीशी संबंध जोडून तिथल्या पोएट्रीचं मराठीत भाषांतर आम्ही करू इच्छितो. तिथल्या कवींना एकत्र करून तुम्ही त्यांना सांगायचं, की आम्हाला तुमच्या कवितांचं मराठीत भाषांतर करायचं आहे, we have great leadership in poetry, poetry आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर चालते, तर they will be very happy. असं काही तुम्हाला culturally penetrate करता येईल. आपल्या– विश्राम गुप्तेच्या– 'अल तामीर' पुस्तकावरून असं दिसतं, की ते लोक फार sensitive आहेत religion च्या बाबतीत.

**विश्व पांथस्थ : पण जोपर्यंत आपण politics बाजूला ठेवून culturally integrate होत नाही, तोपर्यंत ते आपल्याला समजणार नाही.**

**डॉ. नेमाडे :** बरोबर. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर इस्लाम आहे, पीर आहे. त्यांची तत्त्वं आपण वारकरी पंथात घेतली आहेत. असं असताना आपण इतकं isolate राहण्याची गरज नाही. आपल्या हिंदू कल्चरचं आणि इस्लामिक कल्चरचं इतकं वितुष्ट नाही. हे आपले हिंदुत्ववादी समजतात इतकं ते वाईट नाही.

**विश्व पांथस्थ : पूर्वी पावसाळ्यापूर्वी अरबी इकडे मुंबईत दिसत. खूप अरबी लोकांनी केरळ, हैदराबाद आणि इतर ठिकाणच्या बायकांशी लग्नं केलीत, त्यामुळे भारतीय संस्कृतीचे संस्कार त्यांच्यावर थोडेफार झाले आहेत. अशीही काही अरबी कुटुंबं बघितली आहेत, की त्यांना महाराष्ट्राबद्दल, भारताबद्दल खूप माहिती आहे.**

**डॉ. नेमाडे :** हे interaction वाढवलं पाहिजे. ही friendship जुनी आहे, heritage म्हणू आपण. म्हणून आपला वाढता ultra-nationalism, ultra-religionism आहे हा बंदच केला पाहिजे. त्यात आपलं नुकसान होतं, विशेषत: हिंदू लोकांचं खूप नुकसान होतं, कारण आपण अधिक लिबरल आहोत, आपण जर कट्टरपणात अधिक शिरायला लागलो, तर आपल्याला ते जमणारही नाही. त्यामुळे आपलं आधीचंही संचित नाहीसं होतं आणि कारण नसताना enmity वाढते. शंभर मुसलमान संतकवी आहेत. मराठीत पुस्तकं आहेत. त्यावर रीसर्च झाला आहे. म्हणजे मुसलमानी कविता मराठीत आहेत, हे सगळं तिकडे popularise करणं, तिथल्या लोकांना याचा निदान परिचय होणं, हे मराठीत वाढवणं जास्त चांगलं.

**विश्व पांथस्थ : हे होत नाही, कारण तिकडे जाण्याचा NRI चा**

**उद्देश वेगळा असतो. तेव्हा politically, socially भारतामध्ये त्यांची involvement वाढेल या करता काय करता येईल?**

**डॉ. नेमाडे :** तर तुमचा हा जो platform आहे, त्याद्वारे जे आजपर्यंत झालं आहे ते जरी त्यांच्यापर्यंत पोचलं, तरी एक confidence building सुरू होईल. मग तुमच्या generation नं जसा हा मार्ग काढला, म्हणजे असं काही पीठ स्थापन करणं, तर तुमच्या पुढच्या पिढीला अजून ते विस्तारणं शक्य होईल. नंतर मग एखादी मराठी स्त्री जिनं अरब पतीशी लग्न केलं आहे, ती असं काही सुरू करेल, की मराठी आणि गल्फ देशांचे नवीन काहीतरी प्रकल्प करेल, काही awards दिले जातील, इस्रायलमध्ये मराठीला स्थान मिळालं, तसं काहीतरी वाढवणं तुमच्यासारख्यांना शक्य आहे.

**विश्व पांथस्थ : याबाबत अजून एक मुद्दा जो तुम्ही मागे मांडला होता, तो असा होता, की साहित्य संमेलन ज्या उद्देशानं व्हायला हवं, त्या उद्देशानं न होता त्याला वेगळं स्वरूप मिळतं. तुमचं हे मत बऱ्याचजणांना तीव्र वाटलं, पण यामागचा तुमचा विचार काय होता?**

**डॉ. नेमाडे :** साहित्य संमेलनाबद्दल मी काही मुद्दाम आत्ताच म्हटलं असं नाही. कुठलातरी कार्यक्रम असतो, त्यात काही मीडियाचे माईक अचानक पुढे येतात आणि 'येत्या संमेलनाबद्दल तुमचं मत काय', असं विचारतात, त्यातल्या कुणाला तो TRP का काय वाढवायचा होता, म्हणून ते विचारतात. पण आधीपासूनच मी ते स्पष्ट केलं आहे, या प्रश्नाला पूर्ण उत्तर दिलं आहे, की ही जी काही activity सुरू आहे संमेलनाची, ती basically political असते. त्याच्यामागे काही साहित्यिक वगैरे काही नसतं. मग मराठवाड्यातले लोक पुण्यातल्या लोकांना व पुण्यातले लोक मराठवाड्यातल्या लोकांना नावं ठेवणार, मग खराब लिहिणारे साहित्यिक त्यात भाग घेतात, मग काही राजकारणी याला मदत करतात, मग हे लोक त्यांना स्टेजवर एक-दोन तास भाषणं करू देतात, हा असा एक मोठा प्रकार सुरू झाला आहे. कुणीतरी एक पोलिटिकल लीडर sponsor ते करतो. एका संमेलनात या पुढाऱ्यानं सर्व गावात शेकडो aquaguards लावले, संमेलन संपल्यावर सगळे aquaguard तिथले लोक घेऊन गेले. म्हणजे याचा साहित्याशी काहीच संबंध नसतो. आता कुणीही यात लुडबुड करतो. म्हणजे पूर्वी सानेगुरुजी वगैरे असताना वेगळी परिस्थिती होती. पण आता वेगळं आहे, हा अनुत्पादक धंदा केला आहे.

**विश्व पांथस्थ : 'विश्व पांथस्थ' या platform चा उपयोग करून, आपणासारखे जाणकार जे भारत सरकारला भाषाविषयक सल्लागार आहेत, महाराष्ट्र सरकारला भाषाविषयक सल्ला पुरवता, जो आपला ४०-५० वर्षांचा अनुभव, कार्य आहे आणि आमची विनंती आहे, की तुम्ही आम्हाला कायमस्वरूपी मार्गदर्शन द्या, तर...**

**डॉ. नेमाडे :** नक्कीच. आता तुम्ही जसे आलात तसे तुम्ही कधीही विचारलं, तर मी जरूर देईन. मी तर कायम अशाच उद्योगांमध्ये मदत करत आलो आहे. मला लोक विचारतात, की तुम्ही कशी पन्नास वर्षं कादंबरी लिहिण्यावर घालवली. म्हणजे 'बिढार' १९७३ मध्ये आली आणि आता २०१० मध्ये 'हिंदू' आली. मग मधल्या काळात काय करत होता? तर मधल्या काळातही चर्चा, भेटीगाठी, लेक्चर्स, सल्लासमलती नेहमीच सुरू असत. मी सिमल्याला याच्या आधी होतो. त्याआधी मी आसाममध्ये होतो. तिथल्या लोकल लोकांबरोबर दोन वर्षं काम केलं. त्यांची भाषा आपल्याला माहीत नाही, पण त्या भाषेतही खूप मोठं



"अनिवासी मराठी भारतीय मराठी भाषेसाठी खूप काम करू शकतील!"

**– डॉ. भालचंद्र नेमाडे**

लिखाण झालं आहे, त्यांचं स्वतःचं रामायण आहे. हे आपण माहीत करून घेतलं पाहिजे. नुसतंच आपलं त्यांच्यावर लादायचं, पण त्यांचं काहीच घ्यायचं नाही, हे काही बरोबर नाही. ही कल्पना पंतप्रधानांना (डॉ. मनमोहन सिंगांना) एवढी आवडली, की ते म्हणाले, "तुम्ही हे काम करा." आता एवढ्या मोठ्या माणसानं सांगितलं, तर त्याला नकार कसा देणार? मलाही वाटलं, हे केलं पाहिजे. मग तिकडे जाऊन त्यांना एकत्र आणून, काम केलं. तिकडे माझ्या देशीवादाचं बरंच प्रस्थ आहे. सर्वांना वाटतं, की आपल्या भाषेतलंच साहित्य महत्त्वाचं आहे, बाकी भाषांची दखलही घ्यायची नाही. मग त्यांना एकत्र केलं. त्यांच्या भाषांना लिपी नाही. त्यांच्या मौखिक साहित्याची केंद्रं त्रिपुरा व अरुणाचल अशी दोन ठिकाणी आम्ही काढली. तिथे ते लोक जे गातात ते record करायचं, मग ते प्रथम हिंदी, इंग्रजी आणि मग इतर भाषांमध्ये भाषांतर करायचं असा हा प्रकल्प सुरू केला. आता मी गोव्यात माझं राहून गेलेलं लिखाण – कविता पुऱ्या करायला आलो आहे. खूप जुन्या पंचवीसेक वर्षांतल्या लिहून झालेल्या अपुऱ्या कविता, २०-२५ होतील, त्या आता इकडे शांतपणे पूर्ण करायचा विचार आहे.

**विश्व पांथस्थ : मग सिमल्याला काय?**

**डॉ. नेमाडे :** सिमल्याला मी National fellow होतो, Indian Institute of Advanced Study मध्ये. स्वातंत्र्यापूर्वी तिथे Viceroy Lodge होतं आणि तिथे १९४७ साली हॉटेल काढण्याचा प्रस्ताव होता. पण सी. डी. देशमुख, राधाकृष्णन् या लोकांनी मोठ्या उच्च संशोधन संस्थेची संकल्पना दिली. तिथे मोठी library होती, अशी ही Advance Studies ची देखणी संस्था स्थापन केली. दर गुरुवारी Research Fellows असतात त्यांच्याशी संवाद, त्यांना मार्गदर्शन असा कार्यक्रम असतो. हे above university research असं centre आहे. फार थोड्या देशांमध्ये अशा संस्था आहेत. युरोपातसुद्धा कमीच.

**विश्व पांथस्थ : आपल्या नजरेस काही चांगले projects आले, तर तुम्ही जरूर आमच्या निदर्शनास आणून द्या.**

**डॉ. नेमाडे :** जरूर. मी अजूनही अशा प्रोजेक्ट्सशी संलग्न आहेच.

**विश्व पांथस्थ : पण इतिहासातल्या प्रोजेक्ट्सवर काम करण्यापेक्षा वर्तमान आणि भविष्यातल्या गरजा लक्षात घेऊन प्रकल्पावर काम करणं जास्त सयुक्तिक नाही का ?**

**डॉ. नेमाडे :** इतिहासाची पाळंमुळं खूप खोलवर असतात आणि त्याचे परिणाम आणि पडसाद वर्तमानात व भविष्यात नेहमीच उभरतात. तेव्हा काय झालं हे समजून घेतल्याशिवाय, आपण कुठे उभे आहोत, हे समजल्याशिवाय पुढे कसे जाणार? आपल्या मनातले समज-गैरसमज यांची सत्यता पडताळून पाहणं for its own sake आवश्यकच आहे आणि अतिशय नि:पक्षपणे याचा अभ्यास झाला पाहिजे, आपल्या काय चुका झाल्या, पुढे कसं गेलं पाहिजे, याचं हे मार्गदर्शक तत्त्व म्हणून वापरलं पाहिजे.

**विश्व पांथस्थ : आजच्या समाजात, जिथे दहा वर्षांपूर्वीचा इतिहास आजच्या पिढीला नीटसा माहीत नाही आणि आजच्या टेक्नॉलॉजीमुळे त्याचा परिणामही जास्त जाणवत नाही. अशा परिस्थितीत मराठी समाजाला एकत्र आणून पुढे जायचं असेल, तर काय करावं?**

**डॉ. नेमाडे :** खरा इतिहास आधी माहीत असणं गरजेचं आहे. आपण नेमके कोण आहोत, हे नीट कळणं आवश्यक असतं. अंधश्रद्धा, पूर्वग्रह आपल्याकडे फार प्रस्थापित झाले आहेत. म्हणजे पार्टिशन आपल्यावर लादलं वगैरे, द्विराष्ट्रवाद कुणी निर्माण केला वगैरे, ते नीट वाचून अभ्यास करून समजून घेतलं, तर खूप गैरसमज दूर होतात. तुमच्याकडे गल्फमध्ये जे लोक राहतात, ते एका बंधुत्वाच्या नात्यानं एकमेकांकडे बघतात. त्यांना या गोष्टी आड येत नाहीत. ती फार ideal situation आहे. वांशिकदृष्ट्या आपण एकच आहोत, हे differences superficial आहेत, अन्यथा आपण एकच आहोत, हे feeling तुमच्यातून येण्याची जास्त शक्यता आहे. तुम्हाला तो अधिकार आला पाहिजे, की इथल्या कधी बाहेरदेशी न गेलेल्या लोकांना तुम्ही उलट शिकवलं पाहिजे. तिथेही काही मूलतत्त्ववादी असतील, त्यांचेही पूर्वग्रह दूर करता आले तर खूप चांगलं. अन्यथा आपलंही talibanisation वाढत गेलं, की त्याला अंत राहणार नाही. इथे तुम्ही लीड घेऊ शकता.

**विश्व पांथस्थ : खूप धन्यवाद नेमाडे सर. आमचा हा छोटा प्रयत्न आहे. फार अनुभव नाही.**

**डॉ. नेमाडे :** पण तुम्ही minute level ला काम केलं, तर हा छोटा प्रयत्नच बदल मोठा घडवू शकतो.

**विश्व पांथस्थ : 'विश्व पांथस्थ'साठी शुभेच्छा व संदेश.**

**डॉ. नेमाडे :** 'विश्व पांथस्थ'ची लवकर सुरुवात व्हावी, वाढावी आणि आपल्या संस्कृतीला शोभेल इतकं त्याचं स्वरूप विशाल व्हावं, हीच अपेक्षा आणि यासाठी माझ्या खूप शुभेच्छा!

**विश्व पांथस्थ : शेवटी विनंती. 'विश्व पांथस्थ'ची सल्लागार समिती जर स्थापन झाली, तर त्यात आपण सामील व्हावं, ही विनंती.**

**डॉ. नेमाडे :** जरूर! मी सामील होईन.

**पांथस्थ : अतिशय आभारी आहे, Thank you very much, Sir.**






# अनिवासी भारतीय

## अनिवासी भारतीय, भारतीय मूल के व्यक्तियों और विदेशी भारतीय नागरिकों द्वारा किए जाने वाले प्रत्यक्ष विदेशी निवेश संबंधी नीति की समीक्षा

* **अनिवासी भारतीय कौन है ?**
  अनिवासी भारतीय से तात्पर्य है : भारत से बाहर रहने वाला ऐसा व्यक्ति, जो भारत का नागरिक हो अथवा भारतीय मूल का व्यक्ति हो ।
* **भारत के बाहर निवासी कौन है ?**
  विदेशी मुद्रा प्रबंधन अधिनियम, १९९९ की धारा २ (w) में यथापरिभाषित भारत के बाहर निवासी शब्द का अर्थ है : ऐसा व्यक्ति जो भारत का निवासी नहीं हो ।
* **भारत में निवासी व्यक्ति कौन है ? (केवल व्यक्तियों के लिए )**
  विदेशी मुद्रा प्रबंधन अधिनियम, १९९९ की धारा २ (v) में भारत में निवासी व्यक्ति परिभाषा दी गई है : ऐसा व्यक्ति, जो पिछले वित्त वर्ष के दौरान एक सौ बयासी दिन से अधिक समय से भारत में रह रहा हो, परन्तु इसमें शामिल नहीं होगा :

**क.** ऐसा व्यक्ति जो निम्नलिखित में से किसी भी मामले में भारत के बाहर गया या भारत के बाहर रहता हो;
(क) भारत के बाहर रोजगार लेने हेतु या लेने पर, अथवा
(ख) भारत के बाहर कारोबार करने या भारत के बाहर व्यवसाय करने हेतु, अथवा
(ग) ऐसी स्थितियों में किसी अन्य प्रयोजन हेतु, जिनसे उसके अनिशिचत काल तक
भारत के बाहर रहने के इरादे के संकेत मिलें ।

**ख** ऐसा व्यक्ति,जो निम्नलिखित मामलों को छोड़कर, भारत में आया हो या रहता हो;
(क) भारत में रोजगार लेने हेतु या लेने पर, अथवा
(ख) भारत में कारोबार करने या भारत के बाहर व्यवसाय करने हेतु, अथवा
(ग) ऐसी स्थितियों में किसी अन्य प्रयोजन हेतु, जिनसे उसके अनिशिचत काल तक भारत के बाहर रहने के इरादे के संकेत मिलें ।

उपर्युक्त परिभाषाओं से यह निष्कर्ष निकाला जा सकता है कि अनिवासी से तात्पर्य उस व्यक्ति से है जो निम्मलिखित में से किसी कारण से भारत के बाहर चला गया हो या भारत के बाहर रह रहा हो :

१. भारत के बाहर रोजगार लेने हेतु या लेने पर, अथवा
२. जिनसे उसके अनिश्चित काल तक भारत के बाहर रहने के इरादे के संकेत मिलें

अनिवासी द्वारा पर्यटन, यात्रा आदि हेतु भारत में आने से उसकी अनिवासी की हैसियत पर कोई प्रभाव नहीं पड़ेगा। इसी प्रकार, कारोबारी यात्रा, डाक्टरी इलाज, यात्रा, शिक्षा आदि हेतु विदेश जाने वाले निवासी को उसके विदेश में रहने के दौरान भारत में निवासी व्यक्ति ही समझा जाता रहेगा ।

**अनिवासी भारतीय, भारतीय मूल के व्यक्तियों और विदेशी भारतीय नागरिकों द्वारा किए जाने वाले प्रत्यक्ष विदेशी निवेश संबंधी**

**नीति की समीक्षा**

प्रधानमंत्री श्री. नरेन्द्र मोदी की अध्यक्षता में सम्पन्न मंत्रिमंडलीय बैठक में अनिवासी भारतीय (एनआरआई), भारतीय मूल के व्यक्तियों (पीआईओ) और विदेशी भारतीय नागरिकों (ओसीआई) द्वारा भारत में किए जाने वाले प्रत्यक्ष विदेशी निवेश संबंधी नीति की समीक्षा को मंजूरी दे दी। नीति में मंत्रिमंडल द्वारा स्वीकृत निम्नलिखित संशोधन किए गए हैं–

ख. संबंधित पैराग्राफ में संशोधन के उपरांत अनिवासी भारतीय की परिभाषा इस प्रकार होगी : 'अनिवासी भारतीय' (एनआरआई) का अर्थ ऐसे वैयक्तिक नागरिक होंगे जो भारत के बाहर रहते हैं और भारत के नागरिक हैं या जो नागरिकता अधिनियम, १९५५ की धारा ७(ए) के दायरे में 'विदेशी भारतीय नागरिक' कार्डधारक हैं। जिन व्यक्तियों के पास 'भारतीय मूल के व्यक्ति' का कार्ड है और जो १९.०८.२००२ को केन्द्र सरकार द्वारा जारी अधिसूचना नंबर २६०११/४/९८ के तहत पंजीकृत हैं, उन्हें 'विदेशी भारतीय नागरिक कार्डधारक' माना जाएगा।

खख. अनिवासी भारतीयों द्वारा गैर–स्वदेश वापसी आधार पर किया जाने वाला निवेश घरेलू होगा। इसमें एक नया पैराग्राफ जोड़ा गया है :

'फेमा नियमों की अनुसूची ४ के तहत भारत से बाहर रहने वाले व्यक्तियों द्वारा हस्तांतरित या जारी की जाने वाली प्रतिभूतियों के संदर्भ में किया जाने वाला निवेश भारत में रहने वाले निवासियों द्वारा किए जाने वाले घरेलू निवेश की तरह ही माना जाएगा।'

अनिवासी भारतीय के दायरे में ओसीआई कार्डधारकों और पीआईओ कार्डधारकों को शामिल करने के फैसले का अर्थ यह हुआ कि प्रत्यक्ष विदेशी निवेश नीति को आर्थिक, वित्तीय और शैक्षिक क्षेत्रों के संदर्भ में सरकार की घोषित नीतियों के तहत ओसीआई कार्डधारकों और पीआईओ कार्डधारकों को अनिवासी भारतीयों के समकक्ष रखा जाना है। इसके अलावा फेमा नियमों की अनुसूची ४ के तहत भारत से बाहर रहने वाले व्यक्तियों द्वारा हस्तांतरित या जारी की जाने वाली प्रतिभूतियों के संदर्भ में किया जाने वाला निवेश भारत में रहने वाले निवासियों द्वारा किए जाने वाले घरेलू निवेश की तरह ही माने जाने के विषय में उल्लेखनीय है कि इससे प्रत्यक्ष विदेशी निवेश नीति और स्पष्ट होगी तथा इसके तहत किया जाने वाला निवेश विदेशी निवेश के वर्ग में शामिल नहीं होगा। आशा की जाती है कि इस उपाय से विभिन्न क्षेत्रों में निवेश बढ़ेगा, विदेशी मुद्रा का आगमन तेज होगा तथा देश का आर्थिक विकास संभव होगा।

संदर्भ : **प्रधानमंत्री अधिकृत संकेतस्थल**
www.pmindia.gov.in


## विश्व पांथस्थ वर्गणी अर्ज

| विश्व पांथस्थ | 1 वर्षासाठी | 2 वर्षासाठी | 3 वर्षासाठी | चेक/ड्राफ्ट या नावाने काढावा* |
|---|---|---|---|---|
| भारतातील वर्गणीदारांसाठी | ₹ 1,200 | ₹ 2,000 | ₹ 3,000 | Vishwa Panthastha, Pune, India |
| 'युएई'तील वर्गणीदारांसाठी | AED 120 | AED 200 | AED 300 | Knowledge Partners Publications Trading LLC, Dubai, UAE |
| परदेशातील वर्गणीदारांसाठी | US$ 36 | US$ 54 | US$ 80 | |

*कुरियर/पोस्टेज व बँक चार्जेस अतिरिक्त.

• नाव : ..........

• संपूर्ण पत्ता : ..........

..........

• शहर : .......... • राज्य: .......... • देश : ..........

• पिन कोड : (आवश्यक) .......... • दूरध्वनी / मोबाईल : : ..........

• ई–मेल : ..........

• एकूण रक्कम : • चेक/ड्राफ्ट क्र :

विश्व पांथस्थ

**Email :** editor@panthastha.com | **Website :** www.panthastha.com

ए–७०३, निसर्ग सिटी–२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे– ४११०५७

# योग व उपासक

**योगशास्त्र उपासक निकम गुरुजींनी योगाभ्यासाच्या प्रचार व प्रसारासाठी स्थापन केलेल्या 'अंबिका योग कुटीर'च्या शाखा सर्वत्र पसरल्या आहेत. सध्या पुन्हा एकदा योगाची चर्चा सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर निकम गुरुजी, त्यांचे कुटीर आणि या कुटीराच्या दुबई सेंटर शाखेत कार्यरत असलेले सुभाष पलदेसाई यांची ओळख...**

**सौ. विद्या चोरगे,** दुबई



सर्व जगात गौरविलेली भारतीय योगविद्या आपल्या सर्वांना ज्ञात आहेच. ऋषिमुनींनी आपल्या उद्धारासाठीच त्यावर कितीतरी ग्रंथ लिहून ठेवले आहेत. भारत ही तर योगाची पुण्यभूमी आहे. प्रत्येकाने तो स्वत:च्या कल्याणासाठी शिकला पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्रांना भारतीय योग व संस्कृतीचे आकर्षण आहे व त्यातूनच ते नवविध संशोधन करून स्वत:चे फायदे करून घेतात आणि आम्ही मात्र त्यांच्यामागे लागून अजून मार्गच शोधत आहोत.

योग: चित्तवृत्तिनिरोध: । (पातंजल योगसूत्र १.२)

चित्तवृत्तीचा निरोध करणे म्हणजेच योग होय.

'युज' – जोडणे यापासून योग शब्दाची निर्मिती झाली. चित्ताची योग्य स्थिती, आत्मा व मनाच्या स्थितीस जोडण्याचे काम योगामुळे होते.

योगशास्त्राचे निर्माते हिरण्यगर्भ यांच्याकडून गुरुशिष्यपरंपरेने ते शास्त्र पतंजलीपर्यंत आले व त्यांनी ते सूत्रबद्ध केल्याने त्यास 'पातंजल योगसूत्र' असे नाव पडले. चित्ताच्या शुद्धीसाठी त्यांनी अष्टांगयोगाचा उपदेश केला. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी यांमुळे चित्ताची अशुद्धी नष्ट होऊन ज्ञानप्राप्ती होण्यास मदत होते.

अशा या अतिप्राचीन शास्त्राचे बरेचसे उपासक आपल्याला दिसून येतात. त्यातीलच ५० वर्षे अहिरत हठयोगाचा अनुभवसिद्ध अभ्यास करणारे व आपल्या पूर्वजांचे ऋण फेडणारे परमपूज्य हठयोगी निकम गुरुजी यांचा जन्म १९१७ साली १५ ऑगस्टला जळगाव येथे झाला. वडिलांच्या अचानक मृत्यूमुळे शिक्षण अर्धवट सोडून पोलिस शिपायाची नोकरी त्यांना पत्करावी लागली. लहानपणापासून भजन, कुस्ती, मल्लखांब व व्यायाम प्रकारात त्यांनी प्रावीण्य मिळविले. त्याच काळात त्यांना एका बालयोग्याकडून योगासनांची माहिती झाली आणि त्याबद्दल ओढ निर्माण होऊन,






ग्रंथांद्वारे योगशास्त्राचा सखोल, सानुभव अभ्यास त्यांनी केला. नोकरीनिमित्त गुरुजी जेथे जेथे गेले, तेथील लोकांना त्यांनी व्यायामाचे महत्त्व पटवून तेथे व्यायामशाळा विनाशुल्क सुरू केल्या. अंगची मूळची हुशारी व प्रामाणिकपणा यामुळे त्यांची निवड सीआयडी खात्यात मुंबई मुख्य कार्यालयात झाली. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. उपनिरीक्षक या हुद्द्यावरून निवृत्त झाल्यावर त्यांनी काही निवडक सहकाऱ्यांसह 'अंबिका योग कुटीर' या सेवाभावी संस्थेची स्थापना केली.

ऋषिमुनींच्या ज्ञानाचा लाभ व त्याचे महत्त्व त्यांनी जनसामान्यांपर्यंत पोहोचवत प्रगती साधली. आजकालच्या धावपळीच्या, ताणतणावग्रस्त जीवनात सोपा, सुरक्षित, योग्य अभ्यास निश्चित करून गरजेनुसार वनौषधी देऊन व्याधिमुक्त जीवनाचा अनुभव दिला. ठाण्याची मुख्य शाखा व देश–परदेशांतील अनेक शाखा या अनुभवी शिक्षक व सेवाभावी कार्यकर्त्यांच्या मदतीने विनामूल्य चालविल्या जातात.


गुरुजी म्हणतात, 'साधकाच्या दृष्टीने सेवावृत्ती आत्मसात करणे हीदेखील फार मोठी साधना आहे. कारण माणसांतील अहंकार कमी होऊन विनम्रता आल्याशिवाय अंत:करणातील दिव्यत्व प्रकट होत नाही.' 'सेवा' हा त्यांचा आवडीचा शब्द. मानवतेची सेवा करणारे, दु:खितांचे दु:ख दूर करणारे सेवाभावी कार्यकर्ते, धर्मसुधारक, समाजसुधारक हे त्यांना आवडत होते. याउलट योगाचा बाजार करणारे, मार्केटिंगचा, हव्यासातील लोकांचा त्यांना तिटकारा होता. लोकांना भुलविणाऱ्या, पैसे उकळणाऱ्या लोकांचा ते परखड भाषेत समाचार घेत. नैतिक मूल्यांची घसरण होत असताना, इंटरनेट व्यसनी पिढी निर्माण होत असताना शारीरिक, मानसिक, भावनिक आजार वाढत असताना गुरुजींची ही सेवाभावी संस्था त्यांच्या कार्याची गती दिवसेंदिवस वाढवत आहे आणि त्यांचा आदर्श निर्माण करीत आहे. योगेच्छांच्या वैयक्तिक मार्गदर्शनापासून ते त्यांच्या सेवाभावी कार्याचे सर्व साक्षीदार त्यांच्या अभूतपूर्व कार्याचे ऋणी आहेत. अशाचप्रकारे त्यांनी समाजाची व योगाचीही अमोल सेवा केली. 'अंबिका कुटीर'मध्ये आजपर्यंत हजारो कार्यकर्ते व योग प्रशिक्षक तयार झाले. गुरुजींच्या या प्रेमाने व आत्मीयतेने केलेल्या सेवेचा लाभ ज्यांना झाला होता, ते त्यांच्या कार्याच्या प्रसारासाठी समर्पित भावाने जोडले गेले. योगाच्या प्रसाराचे असे अतिउत्कृष्ट काम आज एवढ्या शाखांमधून ५० वर्षे विनाशुल्क स्वेच्छातत्त्वावर चालू शकते हे आजच्या व्यवहारी जगाला कोड्यात टाकणारे आहे.

गुरुजींनी 'आधी केले आणि मग सांगितले' ही उक्ती खरी केली.


# प्रसाद ज्योतिष कार्यालय




ज्योतिषी व वास्तुशास्त्रतज्ज्ञ
**डॉ. प्रसाद गजेंद्रगडकर**
(पीएच. डी. ॲस्ट्रॉलॉजी)



**अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा**
**(पुणे, महाराष्ट्र)**
**+ 91-92261 06027** (फोन + व्हॉट्स ॲप)
**+ 91- 98508 59648** (फोन)

- भविष्य मार्गदर्शन उपाय (फोनवरून सल्ला मिळेल)
- वास्तुशास्त्र मार्गदर्शन व वास्तुदोषांसाठी उपाय
- बोअरवेलसाठी जमिनीतील पाणी पाहणे- सल्ला मिळेल (प्रत्यक्ष साईट व्हिजिटची आवश्यकता नाही. टेलिपथीने जगात कुठेही, जागेवर न जाता सल्ला मिळेल.
- हस्त, रत्न, वास्तू, अंकशास्त्र भविष्य- सर्व सल्ला मिळेल.
- ज्योतिष क्लासेस (फोनवरून शिक्षण घेता येईल)
- लॅब टेस्टेड, शुभ रत्ने, सिद्ध यंत्रे, सिद्ध पारद आणि नर्मदेश्वर शिवलिंग उपलब्ध.
- जन्माआधी जन्मकुंडली तयार करून मिळेल.

**Email : prasad.pune1234@gmail.com**
**Website : www.astrologyprasad.com**








त्यांच्या या योगाभ्यासामुळे अनेक पीडितांचे रोगनिवारण होऊन त्यांना उत्तम स्वास्थ्य प्राप्त झाले. शरीर व मन हे उत्तम कसे ठेवावे याचा मार्ग त्यांनी सामान्य जनतेपर्यंत विनाशुल्क पोहोचविला. लोकांची 'मी', 'माझी' ही मानसिकता त्यांनी बदलवली. एकमेकांची मदत करीत आपुलकीने जीवन कसे जगावे याची कला त्यांनी शिकविली. त्यांच्या या रोपाचे आता वटवृक्षात रूपांतर झाले आहे. 'श्री अंबिका योग कुटीर' हे त्यांनी लावलेले रोप भारतातच नव्हे, तर पूर्ण जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या शाखांतून नि:शुल्क असे सेवाभावी कार्य करीत आहे. 'कुटीर'ला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत आणि गुरुजींचा वसा अनेक सेवाभावी कार्यकर्ते आनंदाने पुढे चालवत आहेत.

दुबई सेंटर येथे कार्यरत असणारे श्री. सुभाष पलदेसाई सर गेली १५ वर्षे जनसामान्यांपर्यंत गुरुजींचे हेच कार्य पोहोचवत आहेत. योगाच्या माध्यमातून आजपावेतो त्यांनी असंख्य पीडितांचे व्याधिनिर्मूलन करून निरोगी आयुष्य कसे जगावे याचे ज्ञान दिले आहे. 'मी', 'तू'पणाचा विसर पाडत सर्व धर्मातील, जातीतील लोकांना हे ज्ञान देण्याचे कार्य ते करीत आहेत. ते कॅन्सर, दमा, संधिवात, साध्य व असाध्य अशा सर्व व्याधींवर झोकून देऊन अभ्यासपूर्ण रीतीने संपूर्ण समर्पणाने त्या व्याधिग्रस्ताची सेवा करतात. तो कितीही गरीब असला किंवा कितीही श्रीमंत असला, तरी सेवाभावाद्वारे त्याला व्याधिमुक्त करण्यासाठी कशाचीही अपेक्षा न ठेवता ते मदतकार्य करीत असतात. आजपर्यंत हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व जाती-धर्मातील मंडळींनी त्यांच्या सेवेचा लाभ घेतला आहे. त्यांचे असे सेवाभावी कार्य त्यांच्या सर्वांशी आपुलकीने, प्रेमाने वागण्यातूनही दिसून येते. अशा या सेवाभावी कार्यामुळे ते इतरांमध्येसुद्धा चैतन्यरूपी आनंद पसरविण्याचे कार्य करतात. त्यांच्या कार्याने प्रेरित झालेले इतर बरेच लोक त्यांचे हे कार्य तडीस नेण्यासाठी तेथे येऊन मदतीच्या रूपाने सेवा देतात.

उत्तम जीवन जगण्यासाठी जसे उत्तम ज्ञानाबरोबरच उत्तम शरीर व मन असणे गरजेचे आहे तेच ऋषिमुनींचे शास्त्र आपल्याला शिकवत, सत्कार्य करीत, गुरुजींचा वसा पलदेसाई सरांनी पुढे चालविला आहे, ही अगदी अभिमानास्पद गोष्ट आहे. अशा निस्सीम कार्यास व कार्यकर्त्यास कोटी

# विश्व पांथस्थ

घे शिडामध्ये भरुन वारा
विसरुन सगळ्या भ्रांती
स्वप्नमनोरा फुलव पिसारा
निसर्गात एकांती

जीवनभर हा ध्यासच न्यारा
नवी दिशा घे सुकाणू हाती
कर निर्मिती ब्रह्म शंकरा
मगच घे विश्रांती

दे टाकूनी हे जुने पुराणे
'पांथस्था' तू सहप्रवासी
ध्येय गाठशील माग ठेवशील
अनुभव तेव्हा अरुप शांती

■ **विश्व पांथस्थ**

वळणे नागमोडीशी
अवघड चुपलख थोडीशी
अनोळखी अन् अनभिज्ञशी,
नवखी अवखळ थोडीशी
येथे बंध नाही जन्मींचे
ना ओळखींचे हिंदोळे
परिचित
वाट धरती सुसंगतीची
असुनीही एकमेका त्रयस्थ
सपुल होतील मार्ग तयांचे जे
अंतरीचे 'पांथस्थ'

■ **संदीप ताजणे,** दुबई

मातीमध्ये रुजवुनी
खोल आपल्या अस्तित्वाची
अर्थ शोधण्या जगण्याचा
अन्
अर्थ द्यावया जगण्याला

कवेत घेऊनी अवघी दुनिया
सप्तसमुद्रा लांघुनिया
परतुनी येण्या पुन्हा मुळाशी
चाल चाल तू 'पांथस्था'

■ **विवेक दसरे,** अहमदनगर





# खेड ते दुबई व्हाया मुंबई

सामान्यतः मराठी माणूस मराठी माणसाला पुढे येऊ देत नाही, असे म्हटले जाते. पण या उक्तीला छेद देत शंभराहून अधिक इच्छुक, गरजू, होतकरू मराठी माणसांना 'युएई'त आणणाऱ्या अभय पाटणेंशी साधलेला संवाद.


मुलाखत व शब्दांकन :

**सौ. चैत्राली जानेफाळकर, शारजा**



'विश्व पांथस्थ'साठी विषय निवडत असताना एक मुद्दा चर्चेला आला. तो म्हणजे मराठी माणूस आखातात किती अगोदर आला? मुख्य म्हणजे मराठी माणसाने आपल्या गावातील किंवा ओळखीतील किती माणसांना आखातात आणण्यासाठी मदत केली? एका कुटुंबातील व गावातील किती माणसे दुबईत आहेत? मुळातच मराठी माणूस इतर मराठी माणसांना मदत करीत नाही, हा गैरसमज दूर करण्यासाठी एखादे उदाहरण आपल्यासमोर आहे का? डॉ. कडवे यांनी मग श्री. अभय पाटणे यांचे नाव सुचविले व फोन करून त्यांची भेटीसाठी वेळ मागितली. श्री. पाटणे यांनी दुपारीच भेटण्याचे सुचविले व आम्ही बर दुबईमध्ये एट्रीअम बिल्डिंगमध्ये त्यांच्या 'बॉम्बे बाईट्स' या रेस्टॉरंटमध्ये पोहोचलो. आणि या मुलाखतीच्या माध्यमातून एका अनुभवी व मदतीस सतत तयार असणाऱ्या दिलदार मराठी माणसाची ओळख झाली.

पाटणे कुटुंबीय कोकणातील खेडचे. श्री. अभय पाटणे खेडमधून मुंबईत आले व एका सहकारी बँकेत काम करीत होते. अभय पाटणे दुबईत आले १९८१ मध्ये. दुबईला यायला निघाले, तेव्हा विमानतळावर त्यांना निरोप देण्यासाठी साठ लोक ऑफिसचे व साठ नातेवाईक-मित्र अशी एकशे वीस माणसे आली होती. येताना ते दोन किलो पत्रे बरोबर घेऊन आले. इकडे त्यांना घ्यायला पंचवीस लोक आले. त्यांच्या आईने काळजीपोटी खूप सूचना केल्या होत्या. अभय पाटणे यांनी दुसऱ्याच वर्षी सौ. विनता पाटणे यांना दुबईला आणले. त्यालाही आता चौतीस वर्षे झाली आहेत. त्या


## कोणी घर विकतंय का घर?
## सावधान !!

❍ कोणत्याही कारणास्तव आपण घर, फ्लॅट, बंगला, फार्म हाऊस, जमीन विकणार असाल तर तुम्हाला भांडवली नफा (Capital Gain) नक्कीच होणार. नफा झाला की टॅक्स भरावाच लागणार.

❍ यासंदर्भात अनिवासी भारतीयांसाठी एकाच ठिकाणी अनुभवी सीएचा सल्ला आणि कायदेशीर मार्गदर्शन मिळण्याची सोय सौ. गौरी कौस्तुभ देव यांनी पुण्यात करून दिली आहे.

❍ कोणतीही प्रॉपर्टी विकत घेण्याच्या निर्णयापूर्वी आपण वरील दोन्ही सेवांचा लाभ घेतल्यास फसवेगिरीतून वाचण्याची शक्यता आहे. आपली सेवा करण्याची संधी मिळाली तर सल्ला फीमध्ये निश्चितच सवलत मिळणार.

**Lakshmi Keshav Consultants**

27/3, हिंगणे खुर्द, फ्लॅट 3 सी,
श्री चिंतामणी अपार्टमेंट, सिंहगड रोड, पुणे - 411051
मोबाईल : गौरी : 86001 66297 / 97300 73924
ई-मेल : lakshmikeshavconsult@gmail.com



वेळी फक्त गल्फ एअर व एअर इंडिया या दोनच फ्लाईट दुबईसाठी होत्या. आल्यावर त्यांनी 'अहमद सिद्दिकी व सन्स' या कंपनीत महिना १,५०० दिरहाम या पगारावर चीफ अकाऊंटंट म्हणून काम सुरू केले, ते आजपोवेतो त्याच कंपनीत आहेत. अर्थात जबाबदारी खूपच वाढली. १९८१ मध्ये आठ लोक बरोबर काम करीत होते, आता १,२०० लोक कंपनीत काम करतात. त्यापूर्वी त्यांचे काका श्री. सुधीर पाटणे व श्री. मनोहर खातू हे १९७३ मध्ये दुबईला आले होते व याच कंपनीत काम करीत स्थिरावले होते. अभय पाटणे यांनी सुधीर पाटणे यांचा १९७३ मधील एक किस्सा सांगितला. जेव्हा सुधीर पाटणे दुबईला दमरा या नावाच्या बोटीने नऊ दिवस प्रवास करून फ्री व्हिसा घेऊन पोहोचले, तेव्हा त्यांचा व्हिसा शेखसाहेब सुर्वे यांनी आयोजित केला होता. सुधीर पाटणे जबेल अली पोर्टला पोहोचले, तेव्हा त्यांच्या आडनावाच्या स्पेलिंगमध्ये एक चूक होती म्हणून त्यांना प्रवेश नाकारला गेला. मग ते तसेच कुवैतला गेले व वीस दिवसांनी व्हिसातील चूक दुरुस्त करून पुन्हा दुबईला आले. सुरुवातीला ओरिएंट स्टोअर्समध्ये त्यांनी काम केले, कंटाळले. ते कार्गो प्लेनने परत मुंबईला गेले. त्यांनी मग ओळखीने 'अहमद सिद्दिकी व सन्स'मध्ये नोकरी स्वीकारली. त्या काळात म्हणजे साधारण १९८१ मध्ये देरा टॉवर्स ही दुबईतील सगळ्यात उंच इमारत होती. दुबईची ओळख होती. तेथे त्यांची शाखा होती. त्यांनी नंतर अभय पाटणे यांना दुबईला बोलावून घेतले.

अभय पाटणे लवकरच या नोकरीत स्थिरावले. मग खूप लोक त्यांना नोकरीसाठी विचारू लागले, त्यांनीही लोकांना मदत करावी या उद्देशाने जवळपास ५० जणांना दुबईत आणले. त्यात नातेवाईक, गावातील लोक असे सर्व होते. पूर्वी शब्दावर लोकांना नोकऱ्या लागायच्या. आता तशी परिस्थिती नाही. आलेली माणसेदेखील स्वत:च्या मेहनतीवर मिळालेल्या संधीचा योग्य वापर करून, टिकून पुढे गेली आहेत. त्याचा त्यांना खूप अभिमान आहे. एक उदाहरण त्यांनी दिले ते म्हणजे श्री. पंकज कोकाटे यांचे. वीस वर्षांपूर्वी ते नुकतेच आर्किटेक्चर कॉलेजमधून बाहेर पडले होते व त्यांना शारजामध्ये 'गल्फ डायनामिक' या कंपनीत एका इंटेरीअरच्या प्रोजेक्टसाठी ओळखीने सुरुवातीला संधी मिळाली. आज वीस वर्षांपेक्षा जास्त वर्षे कोकाटेंना दुबईत झाली व ते याच व्यवसायात स्थिरावले.

आलेल्या मंडळींनीही मग आपल्या मित्रांना, नातेवाइकांना 'युएई'मध्ये आणण्यास मदत केली. असा तो परिवार वाढत गेला. सुधीर पाटणे, मनोहर खातू यांच्यापासून सुरुवात होऊन आता अभय पाटणे, विनता पाटणे, संजय पाटणे, संध्या पाटणे, संदीप पाटणे, सोनाली पाटणे, पंकज कोकाटे, सोनाली कोकाटे, चंदन पाटणे, अंजली पाटणे, नरेंद्र रेडीज, अश्विनी रेडीज, श्वेता कवळेकर, सुशांत कवळेकर, श्रीनील पाटणे, रोहिणी संसारे, हिमगौरी संसारे, रीमा शेट्ये अशी जवळपास शंभर मंडळी नियमितपणे एकमेकांशी संपर्क ठेवून 'युएई'मध्ये आनंदाने राहत आहेत.

अभय पाटणे यांच्या पहिल्या भेटीतच त्यांचा मनमोकळा स्वभाव आणि 'जे जे आपणासाठी ठावे ते इतरांसी द्यावे' याचे प्रत्यंतर आले. मराठी माणसाची अशी ओरड असते, की मराठी माणूस मराठी माणसाला पुढे येऊ देत नाही, पण पाटणे यांनी याला छेद दिला आणि आपल्याबरोबर अनेक गरजू, होतकरू मराठी माणसांना इकडे आणले. आज नातेवाईक, फॅमिली मेंबर्स आणि असे जवळपास शंभरच्या वर त्यांचे लोक आहेत. मराठी माणसांना आपले वाटावे, आपल्यासाठी आहे असे वाटावे असे खास मराठी चवीचे 'बॉम्बे बाईट्स' रेस्टॉरंट त्यांनी त्यांचे बंधू संजय पाटणे यांच्याबरोबर सुरू केले आहे. सुरुवातीला फक्त तीन माणसांपासून सुरू झालेल्या या रेस्टॉरंटमध्ये आता पन्नास लोक काम करीत आहेत. मराठी माणसाला आवडणारा वडापाव, मिसळपाव यांच्यापासून थाळी, पावभाजी तसेच वेगवेगळ्या चवींच्या डिशेस येथे सामान्य माणसाला परवडतील अशा दरात मिळतात. 'बॉम्बे बाईट्स'विषयी बोलत असताना 'बॉम्बे कॅफेटेरिया' याविषयी माहिती मिळाली. सौ. विनता ते चालवतात. 'विनता यांच्या साथीमुळेच मी इथवर आलो' हे त्यांनी आवर्जून सांगितले. विनता यांनीही सुरुवातीला फॉल बिडिंग, डबे देणे, तसेच येथील साड्या भारतात नेऊन विकणे असे कष्ट घेतले आहेत आणि आज यशस्वीपणे त्या श्री. अभय यांना व्यवसायात साथ देत आहेत. 'बॉम्बे बाईट्स'पाठोपाठ त्यांच्या कन्येनेही या क्षेत्रात आपले पाय रोवायला सुरुवात केली आहे. कन्या श्वेता यांनी 'मुंबईकर्स' नावाचे अजून एक हॉटेल आता सुरू केले आहे. श्री. अभय पाटणे यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचे दर्शन झाले. कला, क्रीडा, व्यवसाय, नोकरी, राजकारण, समाजसेवा अशा विविध क्षेत्रांत त्यांनी यश मिळविले आहे. आपल्या मित्रांचा, नातेवाइकांचा आवर्जून उल्लेखही त्यांनी गप्पा मारताना केला. तसेच मित्रपरिवाराविषयीचे कौतुकाचे शब्दही त्यांच्याकडून ऐकायला मिळाले.

बंधू संजय, मुलगा श्रीनील, कन्या श्वेता, जावई सुशांत यांचीही साथ आणि त्यांची वैयक्तिक प्रगती याविषयी अभय यांनी


सांगितले. या सगळ्या गप्पा सुरू असताना त्यांच्या बोलण्यातून मराठी माणसाविषयी असलेली कळकळ जाणवली. सुरुवातीला दुबईमध्ये फक्त एज्युकेटेड लोक यायचे. कामगारवर्ग कमी होता आणि त्या दोन वर्गांमध्ये खूप अंतर होते. त्यामुळे कामगारवर्गाला कोणी इकडे आणत नव्हता. पण गरजू, होतकरू लोकांना जमेल तेवढी मदत करून अभयजींनी संधी दिली. त्यांनाही आखाती देशाशी ओळख करून दिली. मराठी कामगारवर्गानेही इकडे यावे, ज्यांना शक्य होईल त्यांनी त्यांना मदत करून इकडे आणावे, असे अभयजींना वाटते.

मनामध्ये आठवणींचा खजिना घेऊन दुबईत आलेले अभय पाटणे पूर्वजीवनातल्या खेडच्या आठवणी सांगतात. त्या दिवसांत खाऊन-पिऊन सुखी होतो. पण कष्ट खूप केले, दूध विकणे, पेपर विकणे, जनावरांना चरायला घेऊन जाणे इत्यादी. तसेच त्यांच्या आईविषयीही त्यांनी सांगितले. आज त्या ८३ वर्षांच्या आहेत. खेडमध्ये त्यांचा मोठा वाडा आहे. धार्मिक वृत्तीच्या अभय पाटणे यांनी खेडमध्ये मोठे मंदिरही बांधले आहे. तसेच भविष्यातही काही समाजोपयोगी कामे करायची इच्छा असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

ज्या काळात गावाकडचा माणूस पुण्या-मुंबईला पाठविताना लोकांना जड जायचे त्या काळात पाटणे यांनी दुबईत आगमन केले आणि अनेकांना आणले आणि आता ते दुबईकर आहेत. तरीपण वयाच्या साठीनंतर त्यांचे मन मात्र पुन्हा एकदा मायभूमीकडे ओढ घेतेय... पण तेही बरोबरच आहे! इंदिरा संत यांच्या ओळी इथे आठवतात-

*रक्तामध्ये ओढ मातीची*
*मनास मातीचे ताजेपण*
*मातीतून मी आलो वरती*
*मातीचे मम अधुरे जीवन*

श्री. अभय पाटणे यांच्यासारखे अनेक लोक वेगवेगळ्या देशांत जातात. वैयक्तिक प्रगती करतात. पण पाटणे यांचे वेगळेपण स्वत:बरोबर आपल्या आजूबाजूच्या गरजू लोकांनाही त्यांनी संधी दिली हे आहे. अभयजींना पुढील वाटचालीसाठी 'विश्व



# विश्व पांथस्थ

**मी पांथस्थ असते अतर्क्याच्या वाटेवरची**
**अनंताच्या दिशेचा मागोवा घेत चाललेली**

**अधेमधे पालापाचोळा येतो पायाखाली**
**कधीकाळी मखमली असणाऱ्या स्वप्नांचा**
**आणि**
**कोरड्या ठक्क मनाच्या काही भग्न शिल्पांचा**
**पूर्वी जाणिवा म्हणत त्यांना**

**तो पाचोळा**
**मी पायदळी तुडवते**
**तरीही तो मला विचारतो**
**सोबतीसाठी**

**आणि स्वत:शीच हसून म्हणतो**
**अनंताच्या प्रवासात**
**चकवा लागणारच**
**सांभाळून जा...**

**आता त्या पाचोळ्याचा**
**तितकासा राग येत नाही**
**कीव मात्र येते**
**स्वत:ची आणि त्या अगम्य प्रवासाची**

■ **अभिरुची ज्ञाते**, पुणे

# या... सहभागी व्हा!

# 'विश्व पांथस्थ' तुमचेच आहे!

'विश्व पांथस्थ'मध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता.

तुम्ही युएई, ओमान, कतार, बहरीन, सौदी, कुवेत, कॅनडा, जपान, अमेरिका, युरोप, रशिया, आफ्रिका किंवा भारतात कुठेही राहत असाल तर 'विश्व पांथस्थ'मध्ये लिखाण करू शकता, जाहिरात देऊ शकता किंवा तुमच्या शहरात 'विश्व पांथस्थ'चा संपर्क म्हणून काम करू शकता. जाहिराती व वार्षिक वर्गणी जमा करू शकता.

'विश्व पांथस्थ'मध्ये कोणत्या विषयावर लिहावे, याबद्दल विचारणा होत आहे म्हणून काही सूचना –

अनिवासी भारतीयांची, विशेषतः आखाती मराठी भारतीयांची गरज म्हणजे प्रथम आखातात चांगली नोकरी शोधणे किंवा असलेली नोकरी बदलून दुसरी चांगली नोकरी बघणे, आखातात व्यवसाय-धंदा करण्यासाठी माहिती व मार्गदर्शन मिळविणे, गावाकडे लक्ष देणे व घर घेणे, मुलांचे शिक्षण, सुट्टीत पर्यटन, आरोग्यविषयक सोयीसुविधा व सल्ला, डॉक्टरांची माहिती, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्यक्रम यांविषयी माहिती, सामाजिक उपक्रमांविषयी माहिती व त्यात सामील होण्याची संधी, या सर्व विषयांवर तुम्ही लिहू शकता. किंबहुना तुम्हीच लिहावे, ही अपेक्षा.

'विश्व पांथस्थ' हजारो वाचकांपर्यंत पोहोचणार आहे. तेव्हा ही संधी साधून तुम्ही तुमच्या व्यवसायाची, धंद्याची, उपक्रमाची, प्रॉडक्ट्स, सर्व्हिसेस यांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी छानशी जाहिरात देऊ शकता. जाहिरात तयार नसेल, तर आम्ही ती तयार (डिझाईन) करण्यास मदत करू. तुमच्या व्यवसायाची जाहिरात प्रथम तुम्हीच केली पाहिजे. जे दिसते ते खपते, हे लक्षात ठेवा.

आपल्या आसपास असलेल्या उद्योगांची व उद्योजकांची माहिती द्या. उद्योजकांनीदेखील स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या उद्योगाची माहिती द्यावी (मुलाखत चालेल). आखातात आहात, येण्याची इच्छा आहे, तेव्हा नेटवर्किंग करो, धंदेकी कुछ बात करो, कुछ पैसा जोडो!

परदेशात राहणाऱ्या भारतीयांची अजून एक समस्या म्हणजे त्यांना आपल्या मुलांसाठी किंवा मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्यात अडचण येते. माहितीच मिळत नाही. यावर उपाय एकच. विवाहेच्छू मुला-मुलींची माहिती द्या, त्यासाठी एक विशेष विभाग 'विश्व पांथस्थ' मासिकात असेल.

तुम्हाला नोकरी हवी असेल किंवा असलेली नोकरी बदलायची असेल, तरी 'विश्व पांथस्थ'मध्ये छोटी जाहिरात द्या. तुमच्या कंपनीत तुम्हाला योग्य उमेदवार नोकरीसाठी हवा असेल, तरी छोटी जाहिरात द्या.

कविता, मराठी गझलही जरूर पाठवा.

तुम्ही ज्या ठिकाणी राहत आहात, त्याच्या आसपासची प्रेक्षणीय स्थळे, सुट्टीसाठी कोठे जावे याबद्दल माहितीबरोबर सूचना, लेख तसेच फोटो पाठवा.

मुलांसाठी काही चांगले कोर्सेस, मुलांसाठी काही साहित्य, लिखाण पाठवा.

पैशाचे नियोजन, कोठे वाचवावे, कोठे खर्च करावे, यावर लिहा.

भारतातील सीएंनी (CA) जरूर संपर्क साधावा. 'एनआरआय'साठी (विशेषतः आखातातील मराठी माणसांसाठी) काही विशेष सेवा, सूचना असतील तर त्यावर लिहावे. जाहिरात दिली तरी चालेल.

विविध बांधकाम व्यावसायिकांच्या (बिल्डर्स) गृहयोजना सुरू आहेत. त्यांनी 'विश्व पांथस्थ'मध्ये जाहिरात व लेख दिला, तर उत्तम.

भारतात किंवा परदेशांत भारतीयांसाठी असलेल्या राहण्याच्या सोयी (बेड व ब्रेकफास्ट), पेईंग गेस्ट याबद्दल माहिती (जाहिरात) द्या.

विविध मराठी ग्रुप्स आहेत, त्यांनी आपल्या ग्रुपसंबंधी माहिती द्यावी, उपक्रमांची माहिती द्यावी.

आपल्याला किंवा आपल्या ओळखीत कोणाला काही पुरस्कार मिळाला असेल किंवा काही चांगले यश मिळाले असेल, तर त्याबद्दल लिहा.

तुम्हाला आलेला चांगला किंवा वाईट अनुभव सर्वांबरोबर शेअर करा, त्याबद्दल लिहा.

तुमच्या आसपास एखादा चांगला सामाजिक उपक्रम सुरू असेल, त्याबद्दल व त्यासाठी मदतीची गरज असेल, तर त्याबद्दल लिहा.

'विश्व पांथस्थ' मासिकाचे वितरण संपूर्ण जगभर करण्याचा प्रयत्न आहे, आपले सहकार्य अपेक्षित आहे. तुम्ही तुमच्या मंडळाची, ग्रुपची, कंपनीची, उपक्रमाची जर स्मरणिका काढणार असाल, तर त्यासाठी 'विश्व पांथस्थ' मदत करेल. जमल्यास विशेष अंकदेखील प्रकाशित करता येईल.

लेखकांसाठी : मराठी टाईप करता येत नसेल, तर हाताने लिहून (स्कॅन करून) लेख पाठविला तरी चालेल. तुम्हाला काही विशेष सूचना करायच्या असतील, तर त्याचे स्वागतच आहे.

ई मेल editor@panthastha.com

# प्रिय साकेत...

**एका बाबांचे आपल्या लाडक्या लेकाला आर्जवी पत्र... त्यांच्या नातवाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने!**

**श्री. प्रवीण मानकर**

**प्रिय साकेत,**
**अनेक उत्तम आशीर्वाद!**

पत्र लिहिण्यास कारण, की त्वमेवचा पाचवा वाढदिवस जवळ येऊन ठेपला आहे. तुझ्या मनाने तुला नक्कीच संकेत दिले असतील, की कार्यक्रम कसा असावा? पण माझेही म्हणणे ऐक. एक नवी idea!

आपले आयुष्य आपल्या नातेवाइकांच्या आशीर्वादाने पुढे चाललेले असते. त्यात मित्रमंडळींच्या सदिच्छा भर घालतात. आपण त्यांचे कायम ऋणी राहायला हवे, असे मला सारखे वाटते. त्यांच्याविषयी आदर भावना व्यक्त करण्यासाठी भेटणे गरजेचे आहे. हल्ली काम आणि वेळ यांचे प्रमाण व्यस्त असल्याने खूप दिवस भेट होत नाही. ९५ वर्षांची माझी चुलत आजी आणि तुझी चुलत पणजी मैनाबाई यांच्याशी माझी भेट होऊन पाच वर्षे झाली असतील.

त्वमेवच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपण सर्व परत एकदा आपल्या खेड्यात जाऊ, जेथे अजूनही आपले वडीलधारे, चुलते-पुतणे राहतात. मळ्यामध्ये जाऊ. बांधावरची माठाची भाजी खुडू. 'आपल्या मालकीच्या' खंडोबाच्या मंदिरात जाऊ. शक्य होईल तर डागडुजीसाठी मदत करू. मुख्य म्हणजे एक दिवस प्रदूषणरहित श्वास घेऊ. विचार कर, आपण ६०-७० नातेवाइकांना एकत्र आणले, तर काय धमाल येईल. आपल्या 'खानदानाचा' शंभर वर्षांचा चालता इतिहास बघता बघता बोलायला लागेल. आपण वेळ काढून त्यांना भेटायला गेलो, तर त्यांना नक्कीच खूप आनंद होईल. फार काही अपेक्षा नसतात रे त्यांच्या. प्रत्येक senior व्यक्तीचा आपण त्वमेवच्या हस्ते सन्मान करू. आयुष्य किती प्रवाही आहे हे बघ, ९५ वर्षांच्या आजीला पाच वर्षांचा त्वमेव चॉकलेट आणि साडी अथवा शाल देणार. अरे, प्रत्येकाला कॅडबरी आवडते. त्वमेवसाठी आशीर्वादांची लयलूट (लई लूट) होईल. मला आवडेल हे सर्व बघायला.

साकेत, तुझ्या आजोबांनी १९५० मध्ये 'मोहाडी' नावाचे खेडेगाव सोडून नाशिकमध्ये येण्याचा जो 'शहाणपणा' दाखविला तो अनन्यसाधारण होता. आपल्या प्रगतीला तेच 'migration - स्थलांतर' कारणीभूत आहे. अन्यथा तूही कदाचित शेतीच केली असतीस. मला तर 'परदेश'सुद्धा माहीत झाला नसता. अरे, अजूनही मोहाडीकर विचार करतात, की मी दुबईत आहे म्हणून. त्यांच्याकरिता अज्ञानापोटी, फोरिन म्हणजे दुबई किंवा अमेरिका एवढेच. मी जेव्हा तटस्थपणे गेल्या ५० वर्षांच्या काळरेषेकडे किंवा कालरेषेकडे बघतो, तेव्हा असे लक्षात येते, की आपण खूप प्रगती केली आहे. पण आपण जे 'खेडे' मागे सोडून आलो आहोत, ते 'होते' तेथेच आहे. तसूभरसुद्धा 'सरकले' नाही. ४०-५० वर्षांपूर्वीचा मातीचा गंध माझ्या मनात आहे. आपण पुढे गेलो तरी भान न हरपता, मागे बघायला हवे. ऋण व्यक्त करण्यासाठी आपल्या मातीत, आपल्या माणसांत जायला हवे. ही माझी आजतरी मानसिक गरज झाली आहे. ही गरज 'श्री. वैद्य' या घटनेनंतर उफाळून आली आहे.

साकेत, माझी पण एक Bucket लिस्ट आहे. म्हणजे इच्छांची यादी. त्यात त्वमेवचा मोहाडीला वाढदिवस, हा एक item आहे. तुला कदाचित माझी इच्छा आवडणार नाही.
सद्यःस्थितीत ती शोभत नाही... हल्ली DJ शिवाय वाढदिवस होत नाही ना, म्हणून! पण हा 'बाळ-हट्ट' समज, त्वमेव हट्ट करतो तसा.

तर बघ, विचार कर. मग आपण ठरवू. सर्वांना त्यांच्या वयानुसार नमस्कार किंवा आशीर्वाद.

**तुझा बाबा की तुझे बाबा,**
११ नोव्हेंबर २०१४

---

**(लेखक श्री. प्रवीण मानकर हे सध्या अल् खोबर, सौदी अरेबिया येथे राहत आहेत.)**

# जीवन में एक बार रहना
# सिंगापूर



पहिल्यांदा प्रवासी म्हणून सिंगापूर पाहिले, तेव्हा ते मला मिनी भारतासारखेच भासले होते. पण पुढे नोकरीच्या निमित्ताने तेथे रहिवासी झाल्यावर सिंगापूरचे जे अद्भुत रूप अनुभवता आले ते मात्र अतुलनीय म्हणावे असेच!

**अनामिका बोरकर**, पुणे



नुकतीच वर्तमानपत्रामध्ये सिंगापूरला मलेशियापासून स्वतंत्र होऊन ५० वर्षे पूर्ण झाल्याची बातमी वाचली व मनाने एकदम सिंगापूरमधील आठवणींमध्ये धाव घेतली. १८ वर्षे कशी वायुवेगाने पळाली ते कळलेच नाही. पण असंख्य सुखद आठवणी मनात ठेवून गेली. जगाच्या नकाशावर एखाद्या ठिपक्याएवढा छोटासा देश, पण किती विविधतेने भरलेला आहे, हे तेथे राहिल्याशिवाय समजत नाही. १९८७ साली मी तिथे प्रवासी म्हणून गेले होते. तेव्हा मला सिंगापूर फार फार वेगळे वाटले होते. कारण आम्ही तेव्हा सरंगून रोड या मिनी भारतात उतरलो होतो. 'मुस्ताफा सेंटर'मधील खरेदी, प्रेक्षणीय स्थळांना भेट देणे, 'कोमला विलास'मध्ये इडली-वडा खाणे व पोटभर भारतीय पाहणे यांमुळे सिंगापूर हा दक्षिण भारताचा एक छोटासा हिस्सा असावा, अशी माझी कल्पना झाली. तसे त्यात काही चूक नव्हते. त्या वेळी सिंगापूरला जाणाऱ्या सर्व प्रवाशांना जवळपास असेच वाटत असावे. पण त्याच देशात सिंगापूर एअर लाईन्समधील नोकरीसाठी जेव्हा १९९२ साली रहिवासी होऊन मुक्कामाला गेलो, तेव्हा एकदम वेगळेच रूप समोर आले.

या वेळी आम्ही सिंगापूरच्या मध्यभागापासून थोडे दूर 'बेडॉक' या उपनगरात एका एच.डी.बी.च्या ब्लॉकमध्ये



(इमारतीत) जागा भाड्याने घेतली. चारी बाजूंना चाळवजा सहा मजली ब्लॉक्स व मधल्या मोकळ्या जागेत भाजीबाजार, फळबाजार व उपाहारगृहे अशी त्या भागाची रचना होती. घर खूप छान, उजेडाचे, हवेशीर, फुलफर्निश्ड होते. पण दैनंदिन संसारासाठी आवश्यक सामानाचे काय? त्यामुळे दुसऱ्याच दिवशी माणसांनी व त्यांच्या बोलण्याने गजबजलेल्या बाजारात किरकोळ खरेदीच्या व नवीन ओळखी करण्याच्या उद्देशाने मी बाहेर पडले खरी, पण माझ्या पदरात ओळख तर सोडाच, पण एक साधे स्मितहास्यही पडले नाही. हे नोकरीला सिंगापूरला जाणार व त्यांच्याबरोबर मलाही परदेशी वास्तव्य करायला मिळणार, 'एनआरआय' होणार, यामुळे आकाशाला हात टेकल्याप्रमाणे अधांतरी हवेत तरंगणाऱ्या मला त्या दिवशी सिंगापूरची पहिली झलक अनुभवायला मिळाली. अवतीभवती भरपूर माणसे वावरत होती, पण सगळी चिनी किंवा मले. त्यांची भाषा 'मँडरीन' व 'मले'. ती ना मला कळत होती ना त्यांना माझी इंग्लिश! त्यामुळे संवाद होणार कसा? त्या दिवशी मला परदेशात मुक्काम करून तेथे पाय रोवणे किती कठीण असते, याचा अनुभव आला. सिंगापूरमध्ये पहिला झटका भाषेचा बसतो, विशेषतः ज्या नोकरी करीत नसतील त्या गृहिणींना. कारण रोजच्या व्यवहारांसाठी आजूबाजूला संपर्क तर वाढवावाच लागतो. तोही भाषेशिवाय. कांदे, बटाटे, फ्लॉवर, काकडी, टोमॅटो, कोबी यांसारखे जगन्मित्र सोडले, तर बरीच भाजीमंडळी मला अनभिज्ञ! त्यांचा परिचय भाषेशिवाय व्हावा तरी कसा? सफरचंद, पेरू, केळी यांसारख्या परिचित फळमंडळींशिवाय इतरही खूप फळे बाजारात होती. त्यांच्या नावांचाच जेथे पत्ता नाही तर खायचे धाडस तरी कसे करणार? शेवटी तेथे गेलेल्या व राहणाऱ्या प्रत्येकाला जी हातवाऱ्यांची स्पेशल भाषा यावी लागते त्यात मीही हळूहळू पारंगत झाले. हळूहळू सिंगापूर कळत गेले व बरेच प्रश्न सोपे झाले. हे त्यांच्या कामात व्यग्र व दिवसभर बाहेर. त्यामुळे त्यांना वेळ असेल, तेव्हा त्यांच्याशी होणाऱ्या संवादाखेरीज इतर कोणाशीही न बोलता काढलेला तो पहिला महिना अजूनही पूर्ण लक्षात आहे.

सिंगापूरचे लोक तसे थोडे इतरांपासून अलिप्तच. कोणाच्याही घरात परवानगी घेतल्याशिवाय डोकावणार नाहीत, चौकश्या करणार नाहीत. तसेच नवीन माणसांशी ओळखी वाढविण्याच्या फंदातसुद्धा पडणार नाहीत. भाषा व शिक्षण हेच मोठे अडसर असल्यामुळे असेल कदाचित. हल्लीची पिढी सोडली तर अजूनही पूर्वीच्या पिढीतील बऱ्याच जणांना इंग्लिश येत नाही. पुष्कळ वेळा त्यांच्या बऱ्याच शब्दांचे उच्चार खूप बोबडे व कळायला अवघड वाटतात. वाक्यात कर्ता, कर्म, क्रियापद हे सगळे फॅक्टर असलेच पाहिजेत असे नाही, तर समोरच्याला आपला विषय कळल्याशी कारण. इतके सोपे इंग्लिश बरेचजण बोलतात. माझे इंग्लिश तेथे मस्त चालून गेले, पण ह्यांच्या शुद्ध तर्खडकरी इंग्लिशला मात्र बऱ्याच ठिकाणी मुरड घालून घ्यावी लागली. त्या वेळी बाजूच्या इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, चीन व भारत यापलीकडे काही जग आहे, याचीही ओळख बऱ्याचजणांना नव्हती. ते आपले त्यांच्या रोजच्या व्यवहारात गर्क. तेथील चिनी शेजाऱ्यांची आठवण मी कधीही विसरणार नाही.

आमच्या शेजारच्या घरात एक आजी–आजोबा व त्यांचा दोन वर्षांचा नातू येता–जाता दिसत. त्यातही आजोबा सतत हातात डबा व किटली घेऊन खालच्या चौकातील उपाहारगृहातून सूप, भाजी वगैरे आणण्यासाठी ये–जा करीत व आजीबाई दारे–खिडक्या पुसण्यात गर्क. भाषा कळत नसल्याने बोलाचाली नव्हतीच. तेथे राहायला गेलो त्यानंतर दोन–तीन दिवसांतच सकाळी सकाळी मला अचानक काहीतरी जळाल्याचा वास यायला लागला. घरात तर काही नव्हते. म्हणून मी दार उघडून बाहेर गॅलरीत डोकावले, तर शेजारचे आजोबा छोट्या लाल शेगडीत कोळसे पेटवून कसलेतरी कागद जाळत होते. मी पुढे जाऊन कठड्यापाशी उभे राहिले. तरी माझी जरासुद्धा दखल न घेता त्यांचे कागद जाळण्याचे काम सुरूच होते. त्या सुट्ट्या कागदांची जागा आता कागदांच्या थप्पीने घेतली. त्यावर मला जेव्हा काही चित्रे छापलेली दिसली, तेव्हा मात्र घाबरून मी घरात आले. पुढे आठ–नऊ दिवसांनी हाच प्रकार... आता मात्र माझ्या कुतूहलाची जागा भीतीने घेतली. तिसऱ्या वेळी जेव्हा हाच प्रकार झाला, तेव्हा मात्र ह्यांनी त्यांच्या सहकाऱ्याकडे विचारणा केली. तेव्हा समजले, की हा प्रकार आम्हाला घाबरविण्यासाठी नसून, स्वर्गाच्या वाटेवर असणाऱ्या आजोबांच्या पितरांना आवश्यक त्या वस्तू पुरविण्याचा हा मार्ग होता. पितरांच्या विशिष्ट तिथीच्या दिवशी कागदावर त्या वस्तूंची चित्रे छापून ते कागद जाळले, तर त्या वस्तू त्यांना पोहोचतील, अशी चिनी लोकांची समजूत आहे. मला हे सगळे कळले, तेव्हा खूप हायसे वाटले. माहिती कळली, पण शेजाऱ्यांशी संपर्क शून्य! त्यांची परदेशी शिकणारी मुलगी आली. तेव्हा कुठे तिच्या माध्यमातून आजी–आजोबांशी हास्याचे आदानप्रदान झाले. तोवर आम्हाला तेथे राहायला लागून अर्धे वर्ष होत आले होते. त्यांच्या घरात प्रवेश मिळायला एक वर्ष! माझ्याशी ओळख वाढविण्यात, हसून मान डोलावण्यात, त्यांच्या घरात प्रवेश मिळण्यास, बहुधा मी घरात करीत असलेला दोन वेळचा स्वयंपाक, मुलांची देखभाल कारणीभूत असावी. माझा रोज होणारा स्वयंपाक व आमचा संपूर्ण शाकाहार याबद्दल आमच्या सर्वच शेजाऱ्यांना कुतूहलाची व बरीचशी आदराची गोष्ट वाटत असावी. त्याच्या जोडीला साडी म्हणजे 'सच अ लाँग क्लॉथ' वापरणारी आमच्या संपूर्ण भागात मी एकमेव स्त्री होते. त्याचेही कुतूहलमिश्रित कौतुक होतेच.

तेथील दूरचित्रवाणीवर त्या वेळी फक्त तीन चिनी व दोन मले चॅनल्स दाखवायचे. दिवसातून फक्त अर्धाच तास इंग्लिश सबटायटल दाखविणारी एक चिनी सीरियल यायची. तीच काय ती दिवसभरातील एकमेव करमणूक. रोज सकाळी भलामोठ्ठा पेपर येई. पण त्यात जेमतेम एखादा कॉलम भारताबद्दलच्या बातम्या देणारा असायचा. त्याही कुठल्यातरी खून, दरोडे यांच्याच जास्त असायच्या. इंटरनेटही नव्हते. त्यामुळे भारतातील उलाढालींशी संपर्क ठेवणे मुश्किल. कोणी येणारे–जाणारे मित्रमंडळी कधीतरी मराठी पेपर आणीत, मुले सिंगापूरला यायची तेव्हा घरून आई–वडील वर्तमानपत्रांची कात्रणे पाठवीत, तेव्हा मराठी वाचनाची अगदी पर्वणी वाटे. १९९७ साली पहिल्यांदा 'झी टीव्ही'चे चॅनल दिसायला लागले व भारत पाकिस्तानची मॅच आमच्या छोट्याशा घरात २५–३० जणांनी एकत्र दाटीवाटीत बसून पाहिली, तो आनंद काय वर्णावा! ते झाले पाच वर्षांनंतरचे! पण सुरुवातीच्या काळात साध्या साध्या गोष्टीसुद्धा परदेशात राहून किती अप्राप्य होत्या, त्याची आता कल्पनाही येणार नाही. पण आम्ही तेथे गेलो त्याच वर्षी मले चॅनलने हिंदी भाषेतील महाभारत इंग्लिश सबटायटलसह टीव्हीवर दाखवायला सुरुवात केली, शेजारच्या 'मले' बाईला ही कथा माझ्या देशात घडली असल्याची शंका आली व अशा राजे–राजवाड्यांच्या देशातून आलेली मी तेथे एकदम खूपच पॉप्युलर झाले. त्यानंतर रोज सकाळी अस्मादिकांची स्वारी हातात कोरे कागद व रंगांच्या पेन्सिल घेऊन भर बाजारात चिनी म्हाताऱ्यांच्या गराड्यात 'महाभारत' कथा सांगू लागली. माझ्या दिव्य चित्रकलेतून व हातवाऱ्यांच्या भाषेतून महाभारत कितपत त्यांना कळले देव जाणे! पण त्यानंतर पुराणिकबुवांना ज्याप्रमाणे डाळ–तांदूळ मिळतात, तसा मला रोज वेगवेगळ्या फळांचा प्रसाद चाखायला मिळायला लागला व बऱ्याच नवीन गोष्टींची माहिती झाली. चिनी संस्कृती, सणवार, त्यांच्यातील पोटजातिभेद सगळे तेथेच मला कळले.

इतके करूनही माझ्यापाशी भरपूर रिकामा वेळ राहत होता. एकेदिवशी आसपासच्या भागात फिरत असताना मला म्हाताऱ्या


# आत्मज्योत प्रकाशन
पुणे

**गगनाला गवसणी**
श्री शनिमहात्म्य जन्म-कथा
(अठरा पुराणे व उपनिषदाच्या आधारे)

**भवसागर नावाडी** (मराठी/हिंदी/इंग्रजी)
श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे परमशिष्य
श्री रामानंद बिडकर महाराज यांचे एकमेव शिष्य
श्री. रावसाहेब सहस्रबुद्धे यांचे चरित्र

**नराचा नारायण** (मराठी/हिंदी)
श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे परमशिष्य
श्री रामानंद बिडकर महाराज यांचे चरित्र

**साई सागरातील ८८ मोती** (मराठी/हिंदी)
१८७० ते १८९० या काळात साईबाबांना भेटलेल्या भक्तांचे अप्रकाशित अनुभव!

**प्लॉट नं ६७, फ्लॅट नं. ३, गुरुसेवा अपार्टमेंट, जोग शाळेसमोर, एच.डी.एफ.सी. बँक लेन, मयुर कॉलनी, कोथरूड, पुणे-३८**

**फोन : 98223 43002 / 020 65001112**
**www.aatmajyotprakashan.com**
**aatmajyotprakashan@gmail.com**

माणसांचे 'डे केअर'सारखे एक ठिकाण सापडले व मी तेथे जायला सुरुवात केली. हात धरून फिरवून आणण्यासाठी, डॉक्टरांनी सांगितलेले व्यायाम करवून घेण्यासाठी भाषेची गरज नसते, हेही मला तेथेच कळले व माहिती मिळविण्याचा नवाच मार्ग सापडला. फक्त हातवाऱ्यांच्या आधाराने आपण किती गोष्टी जाणून घेऊ शकतो, हेही मला सिंगापूरच्या वास्तव्यात कळले. याशिवाय तेथे आपल्याला आपल्या व्यक्तिगत धार्मिक गोष्टी करण्याचे, सणवार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, ही गोष्ट मला सिंगापूरच्या बाबतीत खूपच आवडली. त्यामुळे जरी भाषा आली नाही, तरी आपल्याला सांस्कृतिक शॉक कमी प्रमाणात बसतोच. खाण्यापिण्याच्या बाबतीत म्हणाल, तर आम्हा दोघांचे कोठेच काही अडले नाही. सिंगापूर खऱ्या अर्थानेच टूरिस्ट फ्रेंडली आहे. मोठमोठ्या दोन-तीन चाळवजा ब्लॉकमध्ये एक दुकान डाळ, तांदूळ, कांदे बटाटे, नूडल्स, साखर, चहा वगैरे विकणारे असते. चिनी पदार्थ विकणारे, मले पदार्थ विकणारे व भारतीय तमीळ लोकांचे पदार्थ विकणारे एक-एक दुकान तरी ९-१० ब्लॉक्सच्या क्लस्टरमध्ये असतेच. त्यामुळे तसे रोजच्या खाण्यापिण्यात काही अडत नाही. अगदी आपल्या भारतीय भाज्याच हव्या असतील, तर मात्र सरंगून रोडशिवाय पर्याय नाही. तीच गोष्ट उपाहारगृहांबाबत. काही ना काहीतरी आपल्या चवीचे मिळतेच. आम्ही शाकाहारी लोकांना चालणारा 'बो बो चाचा' हा रताळ्याच्या खिरीसारखा पदार्थही शोधून काढला होता. त्यामुळे अगदी उपवासाच्या दिवशीही उपासमार टळली. ही गोष्ट आहे २०-२२ वर्षांपूर्वीची. आता तेथे भारतात मिळत नाहीत इतके पदार्थ मिळतात.

हळूहळू आम्ही तेथे रुळत गेलो, नवीन मराठी लोक नोकरीसाठी येत गेले व पाहता पाहता 'महाराष्ट्र मंडळ' स्थापन झाले. गणपती उत्सव अगदी भारतात व्हावा तसा दणक्यात साजरा व्हायला लागला व मराठी नाटकवेड्या मंडळींनी नाटकेही करण्याचा जोर लावला. माझी व ह्यांची कॉलेजमधली नाटके दिग्दर्शित करण्याची व नाटकात काम करण्याची हौसही त्यामुळे पूर्ण झाली. 'महाराष्ट्र मंडळ' नवीन होते, तेव्हा सरकारकडे आम्हाला प्रत्येक नाटकाचा शब्दशः अनुवाद द्यावा लागे व इमिग्रेशनकडून पासपोर्टवर नाटकात काम करण्यास अनुमती असा शिक्काही! नंतर फक्त नाटकाचे नाव, कामे करणाऱ्या लोकांची माहिती इतकेच बंधन राहिले. लेखकाची परवानगी घेण्यापासून ते नाटक पार पडेपर्यंत दोन महिने कसे कापरासारखे उडून जात. देश सोडून गेल्यावर झालेल्या फायद्यांपैकी हा एक मोठा फायदा. तसेच खूप मोठे मोठे पुढारी, नट त्यांच्या सिंगापूर व्हिजिटमध्ये जवळून पाहता आले. आणखीही बरेच उपक्रम १८ वर्षांत आमच्या खात्यावर जमा झाले.

आमची मुले काही तेथील शाळेत शिकली नाहीत, तरी इतर ओळखीच्या लोकांमुळे तीही माहिती मिळाली. तेथे त्या वेळी तरी लोकल स्कूल व इंटरनॅशनल (अमेरिकन, जपानी वगैरे) स्कूल असे दोनच प्रकार होते. लोकल स्कूलही चांगली होती. शिक्षणाचा दर्जा चांगला होता. तरी शाळा जानेवारी ते डिसेंबर अशा असल्याने भारतातून आलेल्या मुलांचे अर्धे वर्ष शाळा सुरू करताना व अर्धे शाळा सोडून परत भारतात परतल्यावर वाया जात असे. त्यामुळे पाल्य वयाने लहान असेल तरच पालक त्याचे शिक्षण तेथे लोकल स्कूलमध्ये करायचे धाडस करीत. इंटरनॅशनल स्कूलचा पर्याय होता. पण एकतर जागा कमी व फी जबरदस्त! बरेचजण शक्य असेल तर मुले भारतातच ठेवत. आता तेथे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. खरेतर आता सिंगापूर इतके बदलले आहे, की स्वर्ग धरतीवर उतरावा असे वाटते. अत्यंत सुरक्षित अशा सिंगापूरमध्ये सामान्य माणसाला जगण्यासाठी जे जे आवश्यक आहे, ते ते सर्व उपलब्ध आहे. कोणीही आपल्या घरातून चालण्याच्या अंतरात सरकारी वाहन, बस व रेल्वे गाठून प्रवास करू शकेल व देशभर परवडणाऱ्या पैशात हिंडू-फिरू शकेल इतकी सहज सोपी व सुंदर सोय मी इतर कोठेही पाहिली नाही. यातील बऱ्याचशा सुधारणा आमच्यासमोर १८ वर्षांत घडल्या. बदलत्या सिंगापूरचे कौतुक पाहताना एकेदिवशी आमचा परत येण्याचा दिवस ठरला. ज्या चांगी विमानतळावर आम्ही दोघे थोड्याशा साशंक मनाने उतरलो होतो, त्याच विमानतळावर आम्हाला पोहोचवायला आलेल्या मित्रमंडळींच्या गराड्यात आम्ही साश्रू नयनांनी उभे होतो. रिकाम्या हाताने व मनाने आलेल्या आमची मने सुहृदांच्या प्रेमाने ओतप्रोत भरलेली होती. किती लोकांचे प्रेम आम्ही मिळविले, हे त्या दिवशी कळले. आम्ही परत भारतात परतलो, जरा त्रास झाला पण यथावकाश रुळलो. पण आयुष्यातील जो मोठा कालखंड 'जीवन में एक बार जाना सिंगापूर'च्या ऐवजी 'रहना सिंगापूर' म्हणत सिंगापूर या छोट्याश्या देशात अत्यंत आनंदात घालवला तो अविस्मरणीयच...! ■



# मान्यवरांच्या शुभेच्छा



बहरीनमध्ये मोठ्या संख्येने मराठी मंडळी राहतात. तसेच सौदी अरेबिया व कुवैतमधून देखील मराठीजनांचा बहरीनमधील मराठी माणसाशी संपर्क असतो. 'महाराष्ट्र मंडळ बहरीन'चा अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळताना सर्वांना बरोबर घेऊन अनेक मराठी सण साजरे करण्याची संधी लाभली. 'विश्व पांथस्थ'ची कल्पना मला खूप आवडली व मी स्वतः पुढाकार घेऊन बहरीन व सौदीसाठी 'विश्व पांथस्थ'चे काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली. 'विश्व पांथस्थ'ची कल्पना सर्वसमावेशक तर आहेच, शिवाय अनिवासी मराठी भारतीयांच्या प्रश्नांवर या निमित्ताने एकत्र काम करण्याची संधी मिळत आहे. आपण केलेला हा उपक्रम म्हणजे देशापासून दूर गेलेल्या माझ्या मराठी माणसाला महाराष्ट्राशी आपले नातेसंबंध, व्यवहार, व्यवसायाला चालना देणारे हे मासिक असणार आहे, याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. येणाऱ्या नवीन पिढीलाही या अंकातून अतिशय सकारात्मक संदेश जाणार आहे. 'विश्व पांथस्थ'च्या भावी वाटचालीकरिता माझ्यातर्फे व बहरीनच्या समस्त मराठी बांधवांतर्फे हार्दिक शुभेच्छा!

**गजानन विश्वनाथ खोलगाडे**
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळ, बहरीन,
संचालक – नेस्ट प्रॉपर्टी, बहरीन, बहरीन समन्वयक 'विश्व पांथस्थ'
संपर्क : +९७३ ३९१३४६५४, ३४३८७००८, ३७३३२८९७



प्रिय मित्र डॉ. संदीप,
'महाबिझ'च्या पहिल्या सत्रापासून मी आपल्याला, सतत महाराष्ट्राच्या उद्योजकांसाठी काही ना काही मदत करताना पाहिले आहे. एकत्र पण आणले आहे. त्याचा फायदाही काहीजणांना झाला आहे. 'विश्व पांथस्थ'च्या माध्यमातून नक्कीच जास्त फायदा होईल, असा मला विश्वास वाटतो. 'विश्व पांथस्थ'ला मुंबईतर्फे खूप खूप शुभेच्छा!

**डॉ. प्रकाश कोंडेकर**
डायरेक्टर– इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नेचरोपॅथी, मुंबई.
Member, Indian Institute of Public Administration,
Mantralaya, Mumbai.



पर्यटनासाठी अनिवासी भारतीय नेहमीच उत्सुक असतात. 'विश्व पांथस्थ'च्या माध्यमातून वाचकांपर्यंत पर्यटनाचे विविध पर्याय कळतील. पर्यटनाला व पर्यटकांना त्याचा लाभ मिळेल. 'विश्व पांथस्थ' हा खूप चांगला उपक्रम आहे व त्यात सहभागी होण्यास आवडेल.

**अभिजीत पाटील**
चेअरमन, राजा राणी ट्रॅव्हल्स, मुंबई



# दुबईमधील खाद्यभ्रमंती

काही वर्षांपूर्वी 'युएई'तील मराठी माणसाला 'सिंध पंजाब'मधील गोड शिऱ्यावरच समाधान मानावे लागायचे. पण आता येथे वडापावपासून सावजी चिकनपर्यंत सारे काही अस्सल खवय्यांच्या दिमतीला हजर आहे.


**उमानंद बागडे,**
राास अल् खैमा

आखातात मराठी माणूस फार पूर्वीच आला, पण आपल्याबरोबर मराठी खाद्यपदार्थ घेऊन नाही. खूप दिवस, नव्हे खूप वर्षे 'युएई'मध्ये मराठी खाद्यपदार्थ मिळत नसत किंवा मराठी पदार्थ मिळणारे रेस्टॉरंट नव्हते. 'सिंध पंजाब हॉटेल' व काही निवडक ठिकाणी गोड शिरा सकाळी नाश्त्याला मिळत असे. भजी व वडे काही ठिकाणी विशेषत: गुजराती हॉटेल्समध्ये मिळत असत. सरसकट खूप ठिकाणी मिळणारे भारतीय खाद्यपदार्थ म्हणजे इडलीसांबार, डोसा, उत्तप्पा, मोटा राईस वगैरे. तेथील प्रसिद्ध गुजराती हॉटेल्स म्हणजे 'गीतार' व 'उत्तम' ही अजूनही तितकीच लोकप्रिय आहेत.

पण गेल्या पाच-सात वर्षांत हे चित्र पालटलेले दिसते. मराठी माणूस हॉटेल व्यवसायात 'युएई'मध्ये पुढाकार घेताना दिसतो. सुरुवातीला छोट्या उपाहारगृहापासून सुरुवात होऊन आता मराठी माणसाने चालविलेली मराठी उपाहारगृहे (रेस्टॉरंट्स) बरीच झालेली आहेत व त्यामुळे अस्सल खवय्यांची सोय झाली आहे. अगदी वडापाव, मिसळ, पोहे, शिरा, उपवासाच्या पदार्थांपासून ते नागपुरी सावजी चिकन, मटण, कोल्हापुरी तांबडा-पांढरा रस्सा, अस्सल मालवणी-कोकणी कोंबडीवडे, मराठी थाळी असे सगळे कसे छान मिळते. केवळ मराठी व महाराष्ट्रीयच नाही, तर सर्व भारतीय आणि आता तर खूप अरबी कुटुंबे व विदेशी नागरिकदेखील या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना दिसतात. अर्थात ज्यांनी ही मराठी रेस्टॉरंट्स सुरू केली आणि त्याद्वारे आपापली वैशिष्ट्ये टिकवून गुणवत्तापूर्ण सेवा व खाद्यप्रकार खवय्यांना उपलब्ध करून दिले, त्या सर्व मराठी उद्योजकांची मेहनत व धैर्य हे प्रामुख्याने यास कारणीभूत आहे. खाद्यप्रेमींनी त्याला दिलेला प्रतिसादही तितकाच महत्त्वाचा आहे. तेव्हा 'विश्व पांथस्थ'तर्फे या सर्वांना मराठी खाद्यसंस्कृती टिकविण्यासाठी, जगभर वाढविण्यासाठी अनेक शुभेच्छा! 'विश्व पांथस्थ'च्या वाचकांसाठी त्यातील काही नावे खाली देत आहोत. चूकभूल देणे-घेणे व या सर्वांना खाऊन-पिऊन उत्तेजन देणे. ■

- **पेशवा रेस्टॉरंट**
  जीपीओ (करामा) जवळ,
  १७ वा स्ट्रीट, दुबई.
- **सायबा**
  औद मेथा (लॅयसी प्लाझाजवळ)
  दुबई.
- **मनीषा'ज् किचन**
  हयदान कॉलनी, करामा, दुबई.
- **बॉम्बे बाईट्स**
  ॲट्रीयम बिल्डिंग, बॅक स्ट्रीट,
  बर दुबई.
- **कोकण स्वाद**
  आदिल सुपर मार्केटजवळ,
  मीना बाजार, बर दुबई.
- **जिप्सी चायनीज**
  सिटीमॅक्स हॉटेल, बर दुबई.
- **एव्हॉन रेस्टॉरंट**
  गोल्ड सुक, छपरा मार्केट, देरा दुबई.
- **मुंबईकर्स**
  लॅयसी प्लाझाजवळ.
- **पेशवा रेस्टॉरंट**
  शिप कुवैत राऊंड अबाऊटजवळ,
  शारजा.
- **मनीषा'ज् किचन**
  अबु शगारा चोईथरामजवळ, शारजा.
- **धाबा रेस्टॉरंट**
  दमास्कस स्ट्रीट, घिसीस, दुबई.
- **पेटपूजा**
  डीआयसी दुबई.
- **महेश लंच होम**
  छप्पन भोग, सेंटर पॉईंट

## पर्यटन विशेष





# युरोप ट्रिप करताय?

## मग हे वाचाच!

**डॉ. संदीप कडवे**

- लंडन (युनायटेड किंग्डम) हा युरोपचा भाग नाही. लंडन भेटीसाठी यु.के.चा व्हिसा लागतो. बाकी युरोपला भेट देण्यासाठी Schengen visa लागतो.
- दुबईतून ('युएई'तून) U.K. D Schengen visa मिळण्याठी वाफी सेंटर येथे उत्कृष्ट सुविधा केंद्र आहे. स्वत: गेलात तरी तेथील टायपिंग सेंटर्स फॉर्म्स टाईप करण्यास व कोणती कागदपत्रे लागतात याची माहिती देऊन व्यावसायिक मदत करतात.
- U.K. व्हिसा मिळण्यास साधारण तीन आठवडे लागतात. Schengen व्हिसा मिळण्यास ७ ते १० दिवस लागतात. व्हिसासाठी VFS च्या वाफी सेंटरला पासपोर्ट जमा करावा लागतो. व्हिसा पासपोर्टवर स्टँप करून घरपोच मिळतो.
- जुलै-ऑगस्टमध्ये युरोपमध्ये उन्हाळा असतो. तेव्हा युरोप म्हणजे थंडी हा गैरसमज जुलै-ऑगस्टसाठी मनातून काढून टाकावा. अगदीच Top of the Europe (Jungfrajosh) किंवा माऊंट टिटलीस येथे थोडी थंडी वाजते. उबदार स्वेटर पुरेसे होतात. बर्फात मात्र पायांत बर्फरोधक शूज घातलेले उत्तम, नाहीतर काहींना Snow Bite चा त्रास होतो.
- Jungfrajosh (Top of the Europe), स्वित्झर्लंड हे अतिशय उंचीवरचे ठिकाण आहे. येथे खूपजणांना धाप लागते, श्वास घ्यायला त्रास होतो. तेथे हळू चालावे व खूप सामान घेऊन जाऊ नये.




- बऱ्याचशा एअरलाईन्स, विशेषत: स्विस एअर प्रतिप्रवासी २३ किलोची एक बॅग check-in luggage व सात किलोची एक हँडबॅग एवढ्यालाच परवानगी देते. त्यानुसारच पॅकिंग करावे.
- उन्हाळ्यात युरोपमध्ये दिवस मोठा असतो. सूर्योदय ४.३० ला होतो व सूर्यास्त रात्री नऊनंतर होतो. याची सवय होण्यास वेळ लागतो, मोठ्या दिवसाचा फायदा म्हणजे दिवसाउजेडी खूपशी प्रेक्षणीय स्थळे बघून होतात. पाऊस न पडल्यास फारच छान. फक्त बाहेर उन्हात फिरावे लागते, गरम होते, घाम येतो. विशेषत: इटलीमध्ये रोम व व्हॅटिकन बघताना खूप चालावे लागते.
- युरोपमधील बहुतांशी हॉटेलमध्ये एसी नसतो, पंखाही नसतो. याचा त्रास होऊ शकतो.

९. ट्रॅव्हल कंपनीमार्फत युरोपला गेलात, तर जास्त ठिकाणे बघून होतात. राहण्याची व जेवणाची सोय आधीच केलेली असते, म्हणून वेळ वाचतो. पॅकेजनुसारही पैसे वाचत असावेत. 'थॉमस कुक'तर्फे गेल्यास सर्व ठिकाणी (सातही देशांत) चांगले भारतीय जेवण मिळते. अर्थात त्यामुळे स्थानिक खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येत नाही.

- राहण्याची सोय बऱ्याचदा (ट्रॅव्हल कंपनीतर्फे) शहरापासून दूर असते. जाण्या-येण्यात वेळ जातो, पॅरिसमधील Forest Hill (Medow) हॉटेलच्या रूम व सर्व्हिस खूप दयनीय आहेत. इतरही हॉटेलच्या रूमसाईज साधारण असतात.
- पासपोर्ट, पैसे, दागिने, मोबाईल वगैरे महत्त्वाच्या वस्तू खूप जपाव्या लागतात. विशेषत: फ्रान्स व इटलीमध्ये. एकदा Schengen च्या एका देशात प्रवेश केल्यानंतर दरवेळी पासपोर्ट दाखवावा लागत नाही.
- खूप भारतीय पर्यटक प्रवासात लाजिरवाणे वागतात. विशेषत: जेवताना व नाश्त्याच्या वेळी युरोपमध्ये जवळपास सर्व ठिकाणी नळाचे पाणी पिण्यासाठी वापरतात. प्रवासात लागल्यास एक ते दोन युरोमध्ये पाण्याची बाटली मिळते. पण खूप प्रवासी जेवताना व नाश्त्याच्या वेळी आपल्याजवळील बाटल्यामध्ये तेथील वॉटरजगमधील पाणी भरून घेतात. त्यामुळे बाकी लोकांना पाणीच मिळत नाही. भारतीय हॉटेलमध्ये विनंती केल्यास पाण्याची बाटली किचनमधून भरून देतात.





- दहा–बारा दिवसांची टूर असल्यास कपडे धुण्याला, वाळविण्याला वेळ मिळत नाही. तेव्हा कपड्यांचे, पायमोज्यांचे अतिरिक्त जोड बरोबर नेणे योग्य ठरते.
- दहा–बारा दिवसांत सात–आठ देश बघणे म्हणजे बऱ्याचदा भोज्याला शिवण्यासारखे होय. लंडन (U.K.) एक–दोन दिवसांत मुळीच बघून होत नाही. पण रस्त्याने म्हणजे बसने जाताना अतिशय निसर्गरम्य युरोप बघायला मिळतो. खूप फोटो काढावेत. ग्रुपबरोबर प्रवास करताना तर अजून मजा येते. आठवणी राहतात.
- ट्रॅव्हल कंपन्या हॉलंडमध्ये वूडन शू (लाकडी जोडे) बनविणारी फॅक्टरी दाखविण्यास नेतात. एक भाग म्हणून ठीक आहे, पण कोणीही ते शूज घेत नाही. तेव्हा तेथे भेट हा वेळेचा अपव्यय आहे. चीज फॅक्टरीला भेट ठीक आहे, पण तेही मर्यादित असावे. BMW शोरूम (म्युनिक) व Ferrari Showroom (इटली) येथील भेटीदेखील बऱ्याच अंशी वेळेचा अपव्यय ठरतात.
- स्वत: ट्रिप प्लॅन करीत असाल, तर हॉटेलचे बुकिंग इंटरनेटवर अगोदरच करावे. स्वस्तात पडते व काळजी करावी लागत नाही. युरोपमध्ये सर्व ठिकाणी ट्रेनने जाता येते, त्याचेही बुकिंग इंटरनेटवर करावे. फारच स्वस्तात पडते, विशेषत: दूरच्या प्रवासासाठी!
- डिस्ने लँड पॅरिसला भेट देताना सकाळी नऊ वाजता जावे. खूप गर्दी असते. नकाशा नीट बघून कोठल्या राईड्स करायच्या ते अगोदरच ठरवावे. फास्ट पासची (विनाशुल्क) सोय काही राईड्सना असते, तेथे फास्टपास घ्यावा. एक–दोन तासांनी रांगेत उभे न राहता थेट प्रवेश मिळतो. त्या वेळात दुसरी राईड करावी.
- आयफेल टॉवरला नेहमीच गर्दी असते. दोन–तीन तास लागतात. तेवढाच उंच अजून एक ऑफिस टॉवर (मॉंटपारनासी टॉवर) जवळच आहे. तो आयफेल टॉवरपेक्षा उंच आहे व तेथूनही पॅरिस सुंदर दिसते. वेळ असल्यास त्यालाही भेट द्यावी.

■



# वाचनानंदासाठी 'ग्रंथ तुमच्या दारी'

रसिक वाचकांसाठी सुरू झालेल्या
'ग्रंथ तुमच्या दारी' या आगळ्यावेगळ्या योजनेविषयी...

सौ. स्वाती कडवे, दुबई



‘ग्रंथ तुमच्या दारी’ अर्थात ‘माझे ग्रंथालय’, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नासिक यांच्यातर्फे ‘ग्रंथ तुमच्या दारी’ या योजनेची सुरुवात श्री. विनायक रानडे यांनी केली व बघता बघता सर्व महाराष्ट्रात या ग्रंथपेट्या पोहोचल्या. एका पेटीत शंभर विविध लेखकांची विविध विषयांची पुस्तके ठेवायची, ती पेटी एका ठिकाणी ग्रंथपेटी समन्वयकाकडे ठेवायची. त्याने मग त्या पेटीची जबाबदारी घेऊन आसपासच्या मराठी वाचकांना या योजनेची माहिती देऊन त्या पेटीतील पुस्तके मोफत वाचायला द्यायची अशी ही योजना. आजकालच्या धावपळीच्या जीवनात सर्वांनाच ग्रंथालयात जाण्यास वेळ मिळत नाही, सगळी मराठी पुस्तके विकत घेणे शक्य होत नाही आणि घेतली तरी एकदा वाचून झाल्यावर ती पुस्तके बाकी कोणी वाचू शकत नाही. म्हणून ‘ग्रंथ तुमच्या दारी’ ही अभिनव योजना सर्वच वाचकांना अल्पावधीतच खूप आवडली. अनेकांनी ही ग्रंथपेटी आपल्या प्रियजनांच्या आठवणीसाठी, वाढदिवसासाठी भेट द्यायला सुरुवात केली. या पेटीवर व आतील पुस्तकांवर मग या दात्यांच्या नावाचा शिक्का असतो.

दुबईस्थित डॉ. संदीप कडवे यांना या योजनेची माहिती होती व नासिकमध्ये त्यांनी एक ग्रंथपेटी भेटदेखील दिली होती. दुबईमध्ये या योजनेची सुरुवात करावी, अशी त्यांची व श्री. विनायक रानडे यांची इच्छा होती. भारताबाहेर प्रथमच या योजनेची सुरुवात होणार होती. ‘युएई’मधील निवडक ग्रंथप्रेमींची बैठक झाली व या योजनेचा प्रारंभ दुबई येथे करण्यावर एकमत झाले.

२० जून २०१४ रोजी ‘ग्रंथ तुमच्या दारी – दुबई’ योजनेची सुरुवात श्री. लोकेश शेवडे व श्री. विनायक रानडे यांच्या उपस्थितीत दुबई येथे झाली. सौ. स्वाती कडवे – दुबई अल् त्वार, सौ. अपर्णा पैठणकर – शारजा, श्री. उमानंद व सौ. जयश्री बागडे – रास अल् खैमा, सौ. स्नेहा मांजरेकर – बर दुबई, श्री. सुजय व सौ. संजीवनी पाटील – बर दुबई, सौ. श्रिया जोशी – बर दुबई, श्री. निखिल व सौ. नेमिका जोशी – शारजा व सौ. नंदा शारंगपाणी – शारजा यांनी समन्वयक म्हणून अतिशय उत्साहाने प्रत्येकी एका ग्रंथपेटीची जबाबदारी घेतली. सौ. स्वाती कडवे या ‘कुसुमाग्रज प्रतिष्ठान’च्या दुबई समन्वयक आहेत. त्यानंतर एका वर्षात अबू धाबीत दोन ठिकाणी ग्रंथपेटी ठेवण्यात आली. सौ. नीलिमा वाडेकर व सौ. अस्मिता देशमुख यांनी उत्साहाने याची जबाबदारी घेतली. बर दुबईमध्ये आता सौ. सुजाता भिंगे यांच्याकडे २५ पुस्तकांची पेटी उपलब्ध आहे. अतिशय वाचनीय मराठी पुस्तके वाचकांना विनामूल्य वाचावयास मिळतील. फुजेराच्या ग्रंथपेटीचा शुभारंभ झाला आहे. एक ग्रंथपेटी श्री. अभय दुधाणकर यांच्याकडे उपलब्ध आहे. वाचकांचाही प्रतिसाद छान मिळतो आहे. ‘युएई’च्या चोखंदळ वाचकांसाठी आता विविध विषयांवरील तीनशेपेक्षा जास्त मराठी ग्रंथ/पुस्तके यांचा खजिना आपल्याकडे आहे.

यानंतर ही योजना आता सौदी अरेबिया (अल् खोबर), नेदरलँड (ॲमस्टरडॅम) व जपान (टोकियो) येथेही पोहोचली आहे. ‘कुसुमाग्रज प्रतिष्ठान’च्या या योजनेचा लाभ जास्तीत जास्त वाचकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. तुम्हाला एखादी ग्रंथपेटी प्रायोजित करायची असेल किंवा सांभाळायची असेल, तर जरूर संपर्क करा. तुम्ही ‘कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नासिक’ येथे थेट **श्री. विनायक रानडे** (Mobile +91 99 22 22 5777, WhatsApp + 91 9423972394, Email - vinran007@gmail.com) किंवा **दुबईत सौ. स्वाती कडवे** (Mobile: 050 2152782, E-mail - swati@kadwe.com) यांच्याशी संपर्क करावा. ■

# पांथस्थ

## एका वेगळ्या दृष्टिकोनातून

संदर्भ : ताओ उपनिषदातील 'ताओ'चा अर्थ

अनुवाद : **श्री. ब्रिजमोहन हेडा**

ताओ हा फार आगळावेगळा अर्थगर्भ शब्द आहे. त्याच्या अर्थावर थोडा दृष्टिक्षेप टाकला, तर आपल्याला पुढे जायला मदत होईल. गोष्ट जितकी अधिक गंभीर असेल तितके तिच्यात अर्थाचे विविध पैलू समाविष्ट असतात. आणि जेव्हा एखादी गोष्ट विविधार्थी, विविध स्तरामवरील अर्थच्छटा व्यक्त करणारी असते, तेव्हा स्वाभाविकपणेच त्यात सुबोधता, सोपेपणा राहत नाही. ताओचा एक अर्थ आहे पथ, मार्ग. परंतु सगळेच मार्ग बंदिस्त असतात. पक्षी आकाशातून उडताना मार्ग तयार होतो खरा; परंतु तो बंदिस्त, चाकोरीबद्ध मार्ग नसतो. ताओ तसा मार्ग आहे. प्रत्येक वाटेवर पाऊलखुणा उमटत असतात आणि मागाहून येणाऱ्यांना त्यामुळे मार्गदर्शन होत असते. परंतु पक्षी आकाशातून उडत असताना जो मार्ग तयार होतो, त्या मार्गावर पक्ष्यांच्या कोणत्याच पाऊलखुणा उमटत नसतात आणि यामुळे नंतरच्या पक्ष्यांना त्यांच्याकडून कोणतेही मार्गदर्शन होत नाही. ताओही तसाच मार्ग आहे. जो मार्ग चाकोरीबद्ध नाही, ज्यावर कोणाच्याही पाऊलखुणा नाहीत, जो मार्ग कोणालाही इतरांकरिता निर्माण करता येत नाही, ज्या मार्गावर केवळ आपल्यालाच आपली वाट चोखाळावी लागते. आपण चालत जातो आणि वाट तयार होत राहते, अशा मार्गाची जर आपण कल्पना करू शकलो, तर आपण ताओचीही कल्पना करू शकतो. नाही; ताओ म्हणजे मार्ग निर्माण करू शकतो. परंतु असा मार्ग तर कोठे आढळत नाही. यामुळेच ताओला मार्ग म्हणणेच उचित होईल. परंतु ताओच्या अर्थाचा अजून एक पदर आहे. आता मार्गाचा दुसरा अर्थ घेऊया. ज्याच्या मदतीने पोहोचता येईल, जो गंतव्य ठिकाणी पोहोचवेल तो मार्ग. परंतु ताओ असा मार्ग नाही. आपण जेव्हा एखाद्या वाटेने चालतो आणि आपल्या ठिकाणावर पोहोचतो, तेव्हा रस्ता, मार्ग आणि गंतव्य ठिकाण हे दोघेही जोडले गेलेले असतात. खरे सांगायचे, तर गंतव्य स्थळ हे मार्गाचे शेवटचे टोक असते आणि मार्ग ही गंतव्य स्थळाची सुरुवात असते. मार्ग आणि गंतव्य स्थळ वेगवेगळे नाहीत. मार्ग आणि गंतव्य स्थळ दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. या दोन्ही गोष्टी परस्परांशी जुळलेल्या आहेत. मार्गाशिवाय गंतव्य स्थळ होऊ शकत नाही आणि गंतव्य स्थळाशिवाय मार्गाला अर्थ राहत नाही. परंतु ताओ मात्र एक असा मार्ग आहे, की जो गंतव्य स्थळाशी जुळलेला नाही. जेव्हा एखादा मार्ग गंतव्य स्थळाशी जुळलेला असतो, तेव्हा प्रत्येकाला त्याच मार्गाने चालावे लागत असते आणि तसे केले, तरच आपण गंतव्य स्थळी पोहोचू शकतो.

## ताओमधील एका कवितेचा मुक्त अनुवाद

आपल्या मुळाकडे परत जाताना  
ज्ञाताच्या कुंपणावरूनच घेता येते झेप अज्ञाताकडे  
जेव्हा बदलतो समाज आपल्या नैसर्गिक प्रवाहामुळे  
जेव्हा समाजात होतो बदल  
तेव्हा वाटते काय गोंधळ आहे हा  
परंतु अशा वेळीही असतो अंतरंगात  
स्थिरचित्त, शांत, द्रष्टा माणूस,  
राहून तो स्तब्ध, करतो स्वतःला अनासक्त  
आणि नेतो तो समाजाला  
निसर्गाच्या शांत नीरव वातावरणात  
कळते त्याच्या प्रज्ञेचे महत्त्व  
जेव्हा संपतो गोंधळ.  
झालेला असल्यामुळे मार्गाशी एकरूप  
तो असतो नेहमी धीरगंभीर, शांत.  
आणि मार्गाशी करतात जे संघर्ष  
त्यांचा उडत असतो सतत गोंधळ.  
जेव्हा मार्गाचे सातत्य आकळते  
तेव्हा त्याच्या बदलाचा स्वीकार करण्याची तयार होत असते मानसिकता.  
मार्गाशी तादात्म्य पावल्यामुळेच  
ऋषीच्या मनात नसतात पूर्वग्रह आपल्या कोणत्याही सहप्रवाशांबद्दल.  
लोकांनी बसवले जर त्याला नेतृत्वपदी  
तर वाढते त्यांची प्रतिष्ठा  
आणि आयुष्यभर करतो तो रक्षण सजीव-निर्जीवांचे,  
कारण या सर्वांचे करत असतो रक्षण प्रत्यक्ष मार्ग.

***(श्री. ब्रिजमोहन हेडा, सध्या वास्तव्य सॅनहोजे, अमेरिका. जन्म १९३६, अमरावती. केशरबाई महाविद्यालय, अमरावती येथे मराठीचे प्राध्यापक होते. १९९६ साली तेथूनच निवृत्त. नागपूर आणि अमरावती विद्यापीठात कलाशाखेचे माजी अधिष्ठाता. अभ्यासपूर्ण लेखन व अनेक पुस्तके प्रकाशित.)***

Dear Non Resident Indian (NRI) Maharashtrian (NRM),

'Vishwa Panthastha', the first magazine being published in Marathi for NRI Marathi readers. This is an attempt to build database of NRM based abroad. It is estimated that there are about 2,00,000 NRMs based in UAE alone. We can not validate it until we have sufficient data with us. Once we have sufficient database, we can do proper analysis of this data, understand needs of NRI Maharashtrians, probably suggest various social projects wherever possible. This database will be useful in reaching to them and also the readers to get in touch with 'Vishwa Panthastha' team.

You can see the list of people, in this database, by visiting website www.panthastha.com, however only select fields would be displayed upon public enquiry. This form is also available on Panthastha website.

We request you to help in building this database with authentic information, as presented below in this form. You can also fill in information for your friends, family members and people you know to make it all inclusive. You may have their information with you already on various social networks, either online or offline.

We propose to remain in touch with all of you, send copies of 'Vishwa Panthastha' to subscribers and also keep you informed you about various events, developments and announcements which matter to you.

Thanks for your registration and association with us.

**editor@panthastha.com**

---

प्रिय अनिवासी मराठी भारतीय,

'विश्व पांथस्थ' हे मासिक खास तुमच्यासाठी सुरू केले आहे. जगभरातील मराठी वाचकांसाठीचे अशा प्रकारचे हे बहुदा पहिलेच मासिक असावे. आखातात किती मराठी मंडळी आहेत, किंवा जगभर किती मराठी मंडळी वास्तव्य करीत आहेत, याचा अंदाज घेण्यासाठी आता 'विश्व पांथस्थ'तर्फे आपण सर्वांची माहिती गोळा करण्याचे ठरविले आहे. फक्त 'संयुक्त अरब अमिराती'मध्ये दोन लाख मराठी भारतीय असावेत, असा अंदाज आहे. त्यांच्या विविध गरजा आहेत, मते आहेत. 'विश्व पांथस्थ'ने हा उपक्रम त्यांच्यासाठीच सुरू केला आहे. आपली माहिती येथे भरून द्या म्हणजे आम्हाला या माहितीचे सविस्तर विश्लेषण करता येईल. रजिस्ट्रेशन केलेल्या सदस्यांची मोजकीच माहिती www.panthastha.com या वेबसाईटवर तुम्हाला बघता येईल. तुम्ही या वेबसाईटवर जाऊन तुमच्या मित्रपरिवाराचीदेखील माहिती ऑनलाईन भरू शकता. माहिती खरी व सध्याची असावी. याद्वारे मग आम्ही तुमच्याशी संपर्क करून विविध उपक्रमांबद्दल, काही आवश्यक विषयांबद्दल तुम्हाला माहिती देऊ शकतो, तसेच तुमचे मत विविध विषयांवर जाणून घेऊ शकतो. तेव्हा या उपक्रमात नक्कीच सामील व्हा व 'विश्व पांथस्थ' परिवाराचा एक सदस्य म्हणून कार्यरत व्हा. तुमच्या सहकार्यासाठी अनेक धन्यवाद!

**editor@panthastha.com**

विश्व पांथस्थ

## Form For Registration

- Name : ______
- Date of Birth: ______
- Sex: Male ☐ Female ☐
- Marital Status: Married ☐ Unmarried ☐
- Education: ______
- Profession: ______
- Mobile: ______ ______
- Email: ______
- PO Box: ______ Emirate: ______
- State: ______
- Country of Residence: ______

- How long you have been staying abroad? : ______
- How long you are staying in this country? : ______
- Which is your native place in India? : City ______ State ______
- Where do you currently stay in India, when you go for vacation? :

  City ______ State ______
- If Married, are you staying with your family abroad?:Yes ☐ No ☐
- If you are staying alone abroad, where does your family stay : ______
- Number of Children : Son ☐ Daughter ☐
- Would you like to subscribe to Vishwa Panthastha Magazine? : Yes ☐ No ☐
- Would you like to be associated with various social projects we may undertake in future? : Yes ☐ No ☐

We thank you for your providing above authentic information.

**editor@panthastha.com**

**Fax: 04 236 7295**

**Email: member@panthastha.com**

**PO Box 85489, Dubai**

दिवाळी २०१६

# ‘मेनका प्रकाशन’ची अक्षर भेट

जुन्या-नव्या लेखक-लेखिकांच्या दमदार आविष्कारानं
नखशिखांत सजलेली अक्षर-मैफल

**माहेर**

मराठी कुटुंबाचा विश्वासू सोबती असलेला, दिवाळीच्या प्रसन्नतेत भर घालणारा ‘माहेर’चा आशयसंपन्न दिवाळी अंक

किंमत ₹ १५०/- फक्त

**मेनका**

विविधतेची साथ आणि नावीन्याचा साज लेऊन येत आहे, दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारा ‘मेनका’चा बहारदार दिवाळी अंक

किंमत ₹ १५०/- फक्त

**जत्रा**

मनमोकळ्या शब्द-चित्रांच्या सोबतीनं, खळाळतं हास्य फुलवण्यासाठी येत आहे ‘जत्रा’चा खुमासदार दिवाळी अंक

किंमत ₹ १५०/- फक्त

## दिवाळी अंकांचे मानकरी

• दिलीप पाडगांवकर • मंगला गोडबोले • प्रवीण दवणे • मंगला सामंत • रूपाली जगदाळे
• प्रज्ञा दया पवार • अरुण कुळकर्णी • ज्ञानेश सोनार • टेकचंद सोनावणे • सतीश कामत
• विभावरी देशपांडे • शर्मिला फडके • पु. रा. रामदासी • चिन्मय दामले • प्रा. साईनाथ पाचारणे
• मोहना जोगळेकर • शेखर गजभार • उत्तम सदाकाळ • सचिन कुंडलकर • श्याम शिंदे
• मानसी गुधाटे-लाड • सुभाष शेंडे • सुप्रिया अय्यर • प्रभाकर झळके • प्रा. रमणलाल शहा • अंजनी नरवणे

*दिवाळीच्या मंगलमय वातावरणात*
*सर्वांगसुंदर वाचनाच्या आनंदाची भर घालणारे*
*‘मेनका प्रकाशन’चे तीनही दिवाळी अंक घरी हवेतच!*

**प्रसिद्धी - ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात**



मेनका प्रकाशन
Publication division of MEDIA NEXT...
२११७, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी,
पुणे ४११०३०. दूरध्वनी : २४३३ ६९६०
हेल्पलाईन : ९५ ९५ ३३ ६९ ६०
ई–मेल : editor@menakaprakashan.com
वेबसाईट : www.menakaprakashan.com
वेबस्टोअर : www.menakabooks.com

Download on the App Store | Google play

# Lets work... together... today... for a better tomorrow

Turnaround, Strategy Consulting, Project Incubation,
Vision Mission Definition Workshops, CEO Coaching,
Market Research and Feasibility Study, Business Plan and Project Reports,
Corporate and Capital Structuring, Cash Flow and Financial Reengineering,
Due Diligence and Business Valuation, Equity and Debt Syndication,
HR Training and Talent Search, Efficiency Improvement Audits
Joint Venture, M&A and Private Equity Placements

MITCON International

Management | Investment | Technology | Consulting

Office: 215, Al Qayada Building, Near Dubai Airport Terminal 2, Deira,
Dubai, United Arab Emirates
Tel: +971 4 236 7295 Mobile: +971 50 5876108
Email: ceo@mitcon.ae Web: www.mitcon.ae